आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range...
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



उत्सव लॉन्स अँण्ड बँक्वेट्स
सोहळा होईल दिमाखदार
utsav LAWNS & BANQUETS
लग्न, साखरपुडा, मौंज, वाढदिवस, कॉर्पोरेट इव्हेंट्ससाठी सुयोग्य ठिकाण.
एसी बँक्वेट हॉल | भव्य लॉन | प्रशस्त पार्किंग | AC रूम्स
बुकींग संपर्क - 7410 510 376 | 7385 951 303



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०६.१०.२०२५ | अंक नं. १५७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | कडली | फॅन्सी चेन व पेंडेंट | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | घड्याळे
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
फॅन्सी पायलच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन उपलब्ध


# इंडस्ट्रीयल इस्टेटमधील कारखानदार भयग्रस्त

## बेकायदेशिर टपऱ्या, दारुड्यांच्या टोळ्या आणि गांजाचे खुलेआमपणे सेवन : तातडीने कारवाई करण्याचे प्रशासनाला दिले निवेदन

नगर – केडगाव इंडस्ट्रीयल इस्टेट परिसरात गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर टपऱ्या उभारण्यात आल्या आहेत. या टपऱ्यांवरुन दिवसरात्र मोठ्या आवाजात लाऊडस्पीकरवर गाणी वाजवली जातात. दारु, गांजा व इतर मादक पदार्थांची विक्री व सेवन खुलेआम केले जाते. टपऱ्यांवर टोळकी जमा होऊन परिसरात असुरक्षित वातावरण निर्माण करतात. कामावर येणाऱ्या-जाणाऱ्या महिला व मुलींवर अश्लील व घाणेरड्या कमेंट्स केल्या जातात. कंपनीधारकांच्या भिंतींलगतच या टपऱ्या उभारल्या गेल्यामुळे उद्योगांची प्रतिमा धोक्यात आली आहे. कंपनीत अधिकारी व पाहुणे भेट देतात तेव्हा हा अस्वच्छ व असामाजिक प्रकार थेट त्यांच्या नजरेस पडतो. कारखानदारांनी अनेकवेळा टपरीधारकांना टपरी हटवण्याची विनंती केली असता टपरीधारकांनी सरळ नकार देत प्रभावशाली व्यक्तींचा हवाला दिला जातो.

सर्वात चिंताजनक बाब म्हणजे या टोळक्यांच्या दहशतीमुळे अवघ्या दोन महिन्यांपूर्वी वसाहतीमध्ये एका परप्रांतीयाचा चोरीच्या प्रकरणातून खून झाला होता, याची देखील माहिती पोलीस प्रशासनाला आहे. तसेच काही महिन्यांपुर्वी एका टपरीधारकाने मोबाईल फोन चोरी करुन तो एका परप्रांतीय कामगाराला विकलेला होता, याचीही माहिती पोलीस प्रशासनाकडे आहे. एवढेच नव्हे तर हे टपरीधारक व त्यांचे टोळके कंपन्यांमधील परप्रांतीय कामगारांनाही सतत शिवीगाळ करतात, त्रास देतात व मारहाण देखील करतात.

या सर्व घटनांमुळे कारखानदार, कामगार व महिला भितीच्या वातावरणात आहेत. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने धोकादायक आहे. त्यामुळे महानगरपालिकेने अतिक्रमण हटवून परिसर मोकळा करावा. रात्रीच्या वेळी जवळपास सगळ्याच कंपन्यांसमोर दारुड्यांच्या टोळ्या बसून दारु पितात, आणि वसाहतीमधील एका फॅशन कंपनी जवळ असा नशा करणाऱ्या टोळक्यांच्या नजारा दिवस-रात्र दिसतो. याबाबत पोलीस प्रशासनाकडे वारंवार निवेदने देण्यात आलेली असून कारवाई झालेली नाही. तरी असामाजिक कृत्यांवर कठोर कारवाई करुन इंडस्ट्रीयल इस्टेट परिसरात कायमस्वरुपी पोलीस गस्त ठेवावी, अशी मागणी अहमदनगर इंडस्ट्रीयल इस्टेट को-ऑप. सोसायटी लि; नगर-पुणे रोड, केडगाव, अहिल्यानगर येथील सर्व कारखानदारांनी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अहिल्या महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांना देण्यात आल्या आहेत.

# हिवाळी अधिवेशनात लव्ह जिहाद विरोधी कायदा लागू करण्यासाठी प्रयत्न करणार

## आ. संग्राम जगताप यांचे आश्वासन; अहिल्यानगरमध्ये हिंदु जनजागृती समितीतर्फे स्वाक्षरी अभियान

नगर – हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र राज्य शासनाने 'लव्ह जिहाद प्रतिबंधक कायदा' राज्यात लागू करावा अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने अहिल्यानगरचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांच्याकडे केली.

'लव्ह जिहाद' हे केवळ वैयक्तिक स्तरावरील गुन्हेगारी कृत्य नसून ते एक संघटित, नियोजनबद्ध आणि वैचारिक युद्ध आहे. यामध्ये खोटी ओळख, प्रेमजाल, विवाह, धर्मांतरण, लैंगिक शोषण, वेश्या व्यवसाय, निर्घृण हत्या, मानव तस्करी आणि विक्री, मानवी अवयवांची विक्री आणि दहशतवादी कारवायांत सहभाग इथपर्यंत गंभीर गुन्ह्यांचा समावेश होतो. जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात या 'लव्ह जिहाद'ला असंख्य हिंदू युवती, महिला बळी पडलेल्या आहेत, त्यामुळे हे रोखण्यासाठी राज्यात हिवाळी अधिवेशनात लव्ह जिहाद विरोधी कायदा पारित करण्यात येणे आवश्यक आहे असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक रामेश्वर भुकन यांनी केले. यावेळी हिंदू जनजागृती समितीच्या रणरागिणी शाखेच्या युवती तसेच धर्मप्रेमी युवक उपस्थित होते. हिवाळी अधिवेशनात मी हा विषय नक्की उपस्थित करणार असे आश्वासन यावेळी आ. संग्राम जगताप यांनी दिले.

हिंदु जनजागृती समितीच्या वतीने लव्ह जिहाद या विषयावर जनजागृती करण्यासाठी नवरात्रोत्सवामध्ये 'मैं हूं दुर्गा' या अभियानांतर्गत व्याख्याने व स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील २५ हून अधिक नवरात्रोत्सव मंडळे व मंदिरामध्ये व्याख्याने घेण्यात आली व उपस्थितांना लव्ह जिहाद प्रतिबंधक कायद्याच्या मागणीच्या समर्थनार्थ निवेदनावर स्वाक्षऱ्या करण्याचे आवाहन करण्यात आले. सर्वच ठिकाणी उपस्थितांनी स्वाक्षरी मोहिमेस प्रतिसाद दिला. लव्ह जिहाद प्रतिबंधक कायद्याची मागणी राज्य शासनाकडे करण्यासाठीचे निवेदन सहस्त्रो लोकांच्या सह्यांसह निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना शुक्रवारी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे देण्यात आले. यावेळी विविध नवरात्रोत्सव मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हिंदु जनजागृती समितीच्या वतीने लव्ह जिहाद प्रतिबंधक कायद्याच्या मागणीसाठी ऑनलाइन स्वाक्षरी अभियान देखील घेण्यात येत असून https://www.hindujagruti.org/hindi/navratri-festival लिंकवर जाऊन स्वाक्षरी नोंदवण्याचे आवाहन समितीने केले आहे.

(छायाचित्र पान २ वर)


कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल चहा
एक किलो मागे एक कोलगेट ब्रश फ्री..फ्री..
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करून पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल | स्वस्त म्हणजे नक्की काय असतें..?
दसरा दिवाळी ऑफर..
लहान मुलांचे 1 वर्ष ते 16 वर्षा पर्यंतचे इंडो वेस्टर्ण ड्रेस, शेरवानी, जॅकेट सूट, ब्लेझर, इंपोर्टेड कार्गो पॅन्ट, अरमानी पॅन्ट, इंपोर्टेड शर्ट, कार्गो शर्ट, इंपोर्टेड टी.शर्ट अशी फॅन्सी आणि ब्रँडेड फेस्टिवल रेंज जी कुठेही पहायला मिळणार नाही आणि तेही सर्व चॅलेंज रेट मध्ये. ₹ 299 /- पासून ते ₹ 1999/- रु. पर्यत ची भव्य रेंज.
मार्केट पेक्षा वेगळं पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

कुठे आहात तुम्ही.. डिसेंबर- जानेवारी मध्ये
हायलाईटस् ऑफ राजस्थान
@ Just 41000 पासून सुरुवात..
६ दिवस
उदयपूर, चित्तोडगड, पुष्कर, जयपुर
सर्व समाविष्ट विमान प्रवासासह मुंबई ते मुंबई
चलो बॅग भरो.. निकल पडो...
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
9112384842, 9850063432

पुरुषांसाठी ब्रॅण्डेड प्रिमीयम क्वालिटी
मर्यादित स्टॉक
जम्बो साईज
7XL पर्यंत शर्ट
5XL पर्यंत टी-शर्ट
44 साईज पर्यंत जिन्स व फॉर्मल पॅन्ट
*कॉटन पॅन्ट व नाईट पॅन्ट योग्य दरात उपलब्ध
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

कोजागरी
क्षण आनंदाचा...
उल्हासाचा...
ग्राहकांच्या विश्वासाचा...
कोजागरी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा !
30 वा वर्धापनदिन
सर्वांचे मन:पुर्वक आभार !
आपल्या स्नेह, सहकार्य आणि विश्वासाच्या बळावर कोजागरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर ३१ व्या वर्षात यशस्वी वाटचाल करीत आहोत.
गुगळे रद्दी डेपो
वेळ : स. ९.३० ते रात्री ८ (बुधवार बंद)
गौरी घुमट, जय भवानी चौक, अहिल्यानगर
Mo.: 9860413446 I 8793547690
१५० किलोपर्यंत वजन एकाचवेळी सर्व प्रकारची पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, लग्नपत्रिका, पोस्टकार्ड, स्वच्छ धुतलेल्या दुध पिशवी इ. खरेदी-विक्री सेवेचं विश्वसनीय दालन.
- संबंधित फर्म - अनुपम बुक स्टॉल पटवर्धन चौक, अहिल्यानगर

डॉ. अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार * हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज * तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत





घरगुती वापरासाठी
योग्य क्षमतेचे दर्जेदार पंप
मिळण्याचे ठिकाण
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING
ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
100% JOB ASSISTANCE
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 9371051769
Old ST stand Branch: Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 7447761769
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# दिवाळीनिमित्त दिव्यांगांसाठी १५ आक्टोंबरला किराणा किटचे वाटप

नगर – दिव्यांगांची दिवाळी गोड होण्यासाठी दिव्यदृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्था अहिल्यानगर यांच्यामार्फत दिवाळी सणानिमित्त किराणाकिटचे वाटप केले जाते. यावर्षी १५ आक्टोंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजीपाला व फळ आडत असोसिएशनच्या आवारात येथे दिव्यांगांना किराणाकिट वाटप करण्यात येणार आहे. अशी माहिती दिव्यदृष्टी संस्थेचे अध्यक्ष कृष्णा तवले यांनी दिली. रोजगार उपलब्ध झालेल्या दिव्यांगांनी २०१९ मध्ये समाजातील इतर दिव्यांगांना रोजगार मिळण्यासाठी दिव्यदृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्थेची स्थापना केली. संस्थेच्या वतीने संगणक प्रशिक्षण केंद्र व इ-सुविधा केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, ऑनलाईन लायब्ररी, लेखनिक व वाचक संघ, संगीत ऑर्केस्टा समुपदेशन केंद्र आदी उपक्रम राबवून त्याद्वारे दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेऊन सन्मानपूर्वक जीवन प्राप्त करून देत आहे. शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व स्वंरोजगार, पुनर्वसन, संशोधन व विकास आदी उद्दिष्टसमोर ठेवून संस्था दिव्यांग जीवनसुधार चळवळीला एक नवी दिशा देत आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजीपाला व फळ आडत असोसिएशनच्या आवारात सकाळी १० वा. किराणाकिट वाटप केले जाणार आहे. दानशूरांनी संस्थेच्या या सेवाकार्यात, सहयोग द्यावा, असे आवाहन दिव्यदृष्टी दिव्यांग संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. दिव्यदृष्टी दिव्यांग संस्था, दुसरा मजला, हरितक्रांती बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर येथील संस्थेच्या कार्यालयात आर्थिक व वस्तुस्वरुपातील मदत करू शकतात. संपर्कासाठी ९८५०८८५९४६.



शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावा तसेच सणासुदीच्या काळात गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त द्या, या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आले. (छाया – लहू दळवी)

# शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा १४ ऑक्टोबरपासून 'जनआंदोलन'

**गर्दीच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त द्या; मोटारसायकलवरील गैरकृत्यांवर कारवाई करावी; राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन**

नगर – शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीमुळे आणि येवू घातलेल्या दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाला तात्काळ प्रभावी उपाययोजना करा, शहरातील अनेक भागात कायमस्वरूपी वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, सिग्नल कार्यान्वित करावेत आणि नाकाबंदी तसेच मोटारसायकलवरील गैरकृत्यांवर कारवाई करावी, अशा मागण्यांचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने देताना शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, महिला जिल्हाध्यक्ष रेश्मा आठरे, प्रा. आशा निंबाळकर, माणिकराव विधाते, कुमारसिंह वाकळे, अजिंक्य बोरकर, विपुल शेटीया, सुनील त्रिंबके, सागर बोरुडे, प्रकाश भागानगरे, संजय सपकाळ, संजय चोपडा, युवराज शिंदे, सारंग पंधाडे, वैभव ढाकणे, प्रा.अरविंद शिंदे, अमोल गाडे, लता पवार, बाळासाहेब पवार, सागर गुंजाळ, जॉय लोखंडे, अमित खामकर, जितू गंभीर, अंजली आव्हाड, परेश पुरोहित, साधना बोरुडे, रंजना उकिर्डे, भरत गारुडकर, सुनंदा शिरोळे, मयुरी गोरे, सुमित कुलकर्णी, ऋषिकेश ताठे, सतीश ढवन, राजेश कातोरे आदीसह उपस्थित होते

निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरात नागरिकांना दररोज प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. दसऱ्याच्या काळातही वाहतूक विस्कळीत झाली होती, आणि दिवाळीत तीच परिस्थिती राहिल्यास नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. तसेच शहरात वारंवार घडणाऱ्या चेन स्नॅचिंगच्या घटनांबाबत पोलिसांनी कठोर कारवाई करून महिलांच्या सुरक्षेची खात्री करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच दिल्लीगेट परिसरात कायमस्वरूपी वाहतूक शाखेचे कर्मचारी नेमावेत. प्रेमदान चौकातील सिग्नल तात्काळ कार्यान्वित करून तेथे कर्मचारी तैनात करावेत. माळीवाडा एसटी स्टॅण्ड परिसरात वाहतूक कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी. भिस्तबाग, कायनेटिक चौक आणि भिंगार शहरातील मुख्य चौकांमध्ये वाहतूक शाखेचे कर्मचारी कायमस्वरूपी नेमावेत. तोफखाना, कोतवाली व भिंगार कॅम्प पोलिस स्टेशन हद्दीत दररोज नाकाबंदी करण्यात यावी. बिननंबर, फॅन्सी नंबर व आवाज करणाऱ्या मोटारसायकलींवर तात्काळ कारवाई करावी.

या सर्व मागण्या तातडीने अमलात आणाव्यात, अन्यथा आठवड्याच्या मुदतीनंतर म्हणजेच १४ ऑक्टोबरपासून जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही राष्ट्रवादी काँग्रेसकडून देण्यात आला आहे.

ब्लॅक स्पोट नाकाबंदी केली जाणार असून संध्याकाळी सात ते बारा वाजेपर्यंत ठिकठिकाणी तपासणी केली जाणार आहे, वाहतूक कोंडीत आम्हीदेखील अडकलो आहे, कर्मचाऱ्यांना वेळोवेळी बंदोबस्त असल्याने संख्या अपुरी राहते वाहतूक कोंडीचा प्रश्न फक्त पोलिसांचा नसून सर्वांच्या सहकार्याची गरज आहे, शहरात विकासाची सुरू आहे मात्र त्या ठिकाणी ठेकेदाराने सूचना फलक लावणे गरजेचे आहे महापालिकेने शहरातील सर्व सिग्नल सुरू करून द्यावेत, तसेच स्ट्रीट लाईट बंद असलेले रात्रीच्या वेळेस रस्त्यावर सर्वत्र अंधार आहे, महापालिकेकडे वारंवार पाठपुरावा केला आहे, मात्र त्यांच्याकडून कुठल्याही उपाययोजना होताना दिसत नाही, तुम्ही आता नगरसेवक म्हणून पालिकेत जातात तेव्हा नागरिकांचे प्रश्न सोडवून घ्यावी अपेक्षा जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

# प्रोफेसर कॉलनी चौकातील कचरा डेपो अन्यत्र हलवा अन्यथा आमरण उपोषण

**नागरिकांचा निवेदनाद्वारे अहिल्यानगर महानगरपालिकेलाइशारा; आरोग्यास गंभीर धोका**

नगर – शहरातील सावेडी परिसरातील प्रोफेसर कॉलनी चौकाजवळ असलेला कचरा डेपो तात्काळ इतर ठिकाणी हलवावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. या संदर्भात नागरिकांच्या वतीने प्रणव भिंगारदिवे यांनी महापालिका आयुक्त व प्रशासक यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, प्रोफेसर कॉलनी चौकाजवळील कचरा डेपोमुळे परिसरात अत्यंत दुर्गंधी पसरत असून, त्यामुळे आजूबाजूच्या रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या ठिकाणी माशा, डास आणि इतर कीटकांचा उपद्रव वाढला असून, विशेषतः लहान मुलांमध्ये आजारपणाचे प्रमाण वाढले आहे. तसेच संपूर्ण परिसर अस्वच्छ झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

प्रोफेसर कॉलनी हा शहरातील महत्त्वाचा आणि वर्दळीचा भाग असून, येथील नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने होणारा त्रास लक्षात घेऊन हा डेपो तत्काळ इतरत्र हलवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. डेपो अन्यत्र हलवल्यास परिसर स्वच्छ राहील आणि नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहील, असेही निवेदनात नमूद केले आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, डेपोमुळे परिसरात दूषित वायू व दुर्गंधी पसरत असून, आजूबाजूच्या वातावरणावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेने तातडीने कारवाई करावी या मागणीसाठी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी प्रणव भिंगारदिवे, शोभा भिंगारदिवे, सौरभ ढोकरीया, मनोज बलदोटा, डॉ. सुमित नलावडे, गणेश गावडे, बाळासाहेब निकम, निलेश वाघ, आशुतोष बांगर, अमित गटणे, मीना वाघ, वर्षा बोराडे, सुरेखा भिंगारदिवे, सुनिता आगरकर, शुभम गवळी, सारंग मुळे, रमेश हिवाळे, दीपक आडेप, दिग्विजय गावडे, निलेश वाघ, मीना वाघ आदीसह प्रोफेसर कॉलनी, प्रोफेसर कॉलनी व्यापारी वर्ग, प्रेमदान हडको, साधना सोसायटी, एलआयसी कॉलनी, आदर्श कॉलनी, डॉ. कांबळे रहिवासी परिसर व लॉईड कॉलनी येथील नागरिक उपस्थित होते.



प्रोफेसर कॉलनी चौकातील कचरा डेपो अन्यत्र हलविण्यात यावा, मागणीचे निवेदन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना देताना परिसरातील नागरिक.

# अतिवृष्टी व पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत ९ ऑक्टोबरला राज्यभर रास्ता रोको आंदोलन

**सोनम वांगचुक यांच्या अटकेविरोधात ६ ऑक्टोबरला जिल्हाधिकाऱ्यांना देणार निवेदन**

नगर – राज्यातील शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांचे अतिवृष्टी व पुरामुळे झालेले प्रचंड नुकसान लक्षात घेऊन, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने राज्यव्यापी आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. पक्षाची राज्य कार्यकारिणी व जिल्हा सचिवांची बैठक नुकतीच ऑनलाईन पद्धतीने पार पडली असल्याची माहिती भाकपचे राज्य सचिव कॉम्रेड सुभाष लांडे यांनी दिली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय किसान सभेचे राज्य अध्यक्ष कॉम्रेड हिरालाल परदेशी होते. मागील दोन महिन्यांपासून विशेषतः पंधरवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सरकारी आकडेवारीनुसार २७ लाख हेक्टर शेती बाधित झाली असली, तरी प्रत्यक्षात ७० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राचे नुकसान झाले आहे. उभी पिके वाहून गेली. शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, जनावरे व माणसांची प्राणहानीही झाल्याचे निदर्शनास आले आहे.

पंजाबसारख्या तुलनेने लहान राज्याने अलीकडील पूरस्थिती हाताळत शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपयांची तातडीची मदत जाहीर केली आहे. मात्र, देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने पंजाबपेक्षा मोठ्या असलेल्या महाराष्ट्रात परिस्थिती पूर्णतः वेगळी आहे. महाराष्ट्राचे भाजपचे मुख्यमंत्री कॉर्पोरेट घराण्यांना अदानी, अंबानी यांना सढळ हाताने मदत करतात, परंतु अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांच्या बाबतीत मात्र केवळ ८ रुपयांची मदत जाहीर करून शेतकऱ्यांप्रती असलेली अनास्था स्पष्ट करत असल्याचा आरोप भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केला आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या सर्व जनसंघटना ४ ते ९ ऑक्टोबरदरम्यान प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचे अहवाल तयार करतील. त्यानंतर ९ ऑक्टोबर रोजी राज्यभर रास्ता रोको, मोर्चे व आंदोलन छेडण्यात येणार आहे. या आंदोलनाद्वारे शेतकऱ्यांना सरसकट प्रति हेक्टर ७० हजार रुपये तातडीची मदत, तसेच फळबागा, घरांची पडझड, जनावरांचे मृत्यू आणि पूरक उद्योगांचे नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी केली जाणार आहे. शिक्षणतज्ञ व पर्यावरणप्रेमी सोनम वांगचुक यांच्या एनएसए कायद्यान्वये झालेल्या अटकेचा निषेध या बैठकीत करण्यात आला. यासंदर्भात ६ ऑक्टोबर रोजी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना निवेदन सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान ११-१२ ऑक्टोबर रोजी मुंबईत पक्षाची राज्य कौन्सिल बैठक होणार असून, यामध्ये अन्य काही महत्वाच्या विषयावर चर्चा केली जाणार असल्याचे कॉ. सुभाष लांडे यांनी म्हटले आहे.

## कमलबाई दहिहंडे यांचे अल्प आजाराने निधन

भिंगार – गवळीवाडा भिंगार येथील रहिवासी कमलबाई



रामभाऊ दहिहंडे (वय ८५) यांचे ६ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर बुऱ्हाणनगर रोड नागरदेवळे फाटा येथील विरशैव गवळी समाज स्मशानभूमी येथे दफनविधी करण्यात आला.

त्यांच्या मागे ४ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भाजपाचे जिल्हा मंडल उपाध्यक्ष शिवाजी, अनिल, बाळासाहेब, राजू दहिहंडे यांच्या त्या मातोश्री होत.

## प्रकाश कोठारी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – शिरुर तालुका मुद्रक संघाचे अध्यक्ष क्वालिटी प्रिंटर्सचे संचालक प्रकाश कोठारी (वय ६३) यांचे ४ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर शिरुर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## यमुनाबाई पवार यांचे अल्प आजाराने निधन



नगर – पवारवाडी सुपा येथील रहिवासी यमुनाबाई श्रीकांत पवार (वय ७८) यांचे ४ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पवारवाडी सुपा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ सुना, ४ नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब, संतोष पवार यांच्या त्या मातोश्री होत.

## विष्णू बडवे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – येथील विष्णू रंगनाथ बडवे (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. हिंद सेवा मंडळ,सिताराम सारडा येथून निवृत्त झालेले होते. निवृत्तीनंतर विविध धार्मिक कार्यक्रमात सहभागी होत. त्यांच्या पश्चात त्यांना दोन भाऊ, दोन मुली, एक मुलगा, नातवंडे आहेत.

# अहिल्यानगर मनपातील रस्ते घोटाळा, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान यावरून लक्ष विचलित करण्यासाठी दंगलींचा डाव

नगर – अहिल्यानगर मधल्या महानगरपालिकेतला साडेचारशे कोटींचा रस्त्यांच्या कामांचा भ्रष्टाचार ठाकरे शिवसेनेने बाहेर काढला. ते प्रकरण आता न्यायालयात गेलं आहे. हे प्रकरण काढलं म्हणून आमच्या शहर प्रमुख किरण काळेंना अटक केली गेली. अहिल्यानगर मध्ये प्रचंड अतिवृष्टी झाली. या सगळ्या वरच लक्ष विचलित करण्यासाठी काहींना दंगली घडवायच्या आहेत. हे जे काही बाडगे हिंदुत्ववादी आहेत जे आज टिळा लावून फिरत आहेत, ते अशा प्रकारच्या दंगली अहिल्यानगर मध्ये घडवत आहेत, अशी टीका शिवसेना खा. संजय राऊत यांनी केली आहे.



खा. संजय राऊत

किरण काळेंनी अहिल्यानगर मनपातील बाहेर काढलेला रस्ते घोटाळा, धार्मिक तेढ, तणावपूर्ण परिस्थिती, अतिवृष्टी याबाबत प्रसार माध्यमांशी संवाद साधताना खा. राऊत बोलत होते. ते म्हणाले, अनेक गोष्टी चर्चेतून सुटू शकतात. पण प्रशासनाला आदेश आहेत की तणाव निर्माण होईल अशा प्रकारचे निर्णय घ्या. प्रश्न सोडवू नका. पोलिसांनी अशा प्रकारचं वर्तन करणं हे कायदा, सुव्यवस्थेसाठी योग्य नाही.

खा. राऊत म्हणाले, मराठवाड्यामध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर सरकारचा बोजवारा उडाला आहे. तो झाकण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या उप कंपन्या या दंगली घडवण्याचा प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्रातलं वातावरण आता दंगलीं पेक्षा पूर परिस्थिती, अतिवृष्टी यावर चर्चा करण्याची गरज असताना त्याच्यावरचे लक्ष विचलित करण्यासाठी, सरकार शेतकऱ्यांना मदत करण्यात कसं अपयशी आहे यावरून लक्ष हटवण्यासाठी हे सुरू आहे.

### ते बोगस, भंपक, ढोंगी हिंदुत्ववादी

खा. राऊत पुढे म्हणाले, हा देश हिंदूंचा आहे. या देशामध्ये हिंदुत्ववाद राहणार. प्रभावीपणे राहणार. हे आम्ही सांगतो आहोत. या हिंदुत्ववाद्यांनी जरी दंगली घडवल्या, मात्र त्यांनी भारत – पाकिस्तान सामन्याला विरोध नाही केला. त्या सामन्याचं मानधन पाकिस्तानी खेळाडूंनी तिथल्या एका प्रमुख दहशतवाद्याच्या संघटनेला दिल आहे. मसूद अझहरला दिल आहे. या गोष्टींना विरोध करण्याची यांच्याच हिम्मत नाही. हे जे काही आता महाराष्ट्रात अहिल्यानगरसह इतरत्र दंगली घडवत आहेत हे बोगस आणि भंपक हिंदुत्ववादी आहेत. ढोंगी लोकं आहेत.



हिवाळी अधिवेशनात लव्ह जिहाद विरोधी कायदा लागू करण्याच्या मागणीचे निवेदन आ. संग्राम जगताप यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कुणाल नागरे, आणासाहेब शिंदे, भरत शिंदे, चैतन्य शेकडे, रामेश्वर भूकन, सौ. शैलजा केदारी, सौ. धनश्री शिंदे आदी उपस्थित होते.

# अहिल्यानगर ते संभाजीनगर रस्त्याची दुरावस्था; खड्ड्यांमुळे बऱ्याच ठिकाणी वाहतुकीची कोंडी

**आ. संग्राम जगताप यांनी वेधले लक्ष, काम तातडीने सुरू करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे अधिकाऱ्यांना आदेश**

नगर – अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. त्यामुळे वाहन चालकांना व नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे बऱ्याच ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत आहे. त्यामुळे तातडीने रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करणे आवश्यक आहे. या रस्त्याच्या कामात लक्ष घालावे, अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी रविवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली. आ.जगताप यांनी उपमुख्यमंत्री पवार यांची लोणी येथे भेट घेत चर्चा करत अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेची सविस्तर माहिती दिली व तातडीने काम सुरू करण्याबाबतचे आदेश दिले.



आ. संग्राम जगताप यांनी अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी करताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना संपर्क करून काम सुरु करण्याचे आदेश दिले.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विषयाचे गांभीर्य ओळखून तातडीने राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना मोबाईलवर संपर्क करून छत्रपती संभाजीनगर रस्त्याची माहिती घेतली व दुरुस्तीचे काम सुरू करण्याचे आदेश दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या या तत्परतेबद्दल आमदार संग्राम जगताप यांनी त्यांचे आभार मानले. तसेच अहिल्यानगर शहरातील विविध समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करण्याची मागणी केली.

# भाकरीचा चंद्र




आज कोजागिरी पोर्णिमा... कोजागिरीच्या चंद्राच्या साक्षीने आज काल कोणाच्या नशिबात निवांत गच्ची नाहीय, तरी देखील ती रम्य गच्ची असलेल्या घरांवर चांगले कार्यक्रम होतील कदाचित..

चंद्र हा पृथ्वीसाठी आकर्षणाचाच विषय राहिलेला आहे, चंद्रामुळे पृथ्वीवरचे दिवस रात्र आणि हवामान हे नियंत्रित होत असते, चंद्रामुळेच समुद्र त्याचे हद्द सोडून कधी बाहेर येत नाही भरती ओहोटीच्या मर्यादेतच राहतो. हे फार थोड्या लोकांना माहीत असेल, चंद्रामुळेच पृथ्वी २३ अंशाने कललेली आहे म्हणून ऋतुमान घड्याळाप्रमाणे घडून येत आहे.. आणि म्हणून सजीव जिवंत आहेत इतकं मोठं महत्त्व चंद्राचं आहे.. त्याविषयी अधिक लिहायचं झाल्यास पूर्ण एक पुस्तक लिहावे लागेल, पण तो विषय इथे लांबवायला नको. अशा या चंद्राच्या विविध आकर्षणांमधूनच जगभरात आज पर्यंत घडलेल्या महत्त्वकांक्षी चंद्रमोहिमांच्या योजना आखल्या गेल्या सर्वात प्रथम १९६९ मधील अमेरीकेच्या अपोलो-११ चांद्रयानाच्याही १० वर्षे अगोदर, म्हणजे १९५९ मधे रशियाचे यान अवघ्या ३४ तासात चंद्रावर उतरले होते व तो एक फास्टेस्ट मून ट्रिप चा विक्रम आजही अबाधीत आहे. जगाची प्रचंड तांत्रिक, संगणकिय प्रगती होऊनही आजतागायत तो विक्रम कुणालाच मोडता आलेला नाही..

चंद्र व पृथ्वीचे सरासरी थेट सरळ असलेले ३,८४००० किमी अंतर ३४ तासात कापण्या साठी त्यांना यानाचा वेग ताशी सरासरी १२००० किमी प्रतिघंटा ठेवावा लागला असेल, असा जर ढोबळ हिशेब व विचार कुणी करत असेल, तर ते चूक आहे,.. कारण हे अंतर चंद्र व पृथ्वीचे थेट सरळ अंतर आहे. व कुठलेही यान हे कधीच असे बंदुकीच्या गोळीसारखे सरळ सरळ रेषेत जाउन कुठल्याही ग्रहावर उतरु शकत नसते.,आपल्या पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षण कक्षेच्या बाहेर (३५०० किमी)गेल्यावर हजारो किलोमीटर लंबवर्तुळाकार प्रवास करुन त्या ग्रहाजवळ पोहचतांना, यानाला एखाद्या चक्रीला मांजा गूंडाळल्या सारख्या प्रदक्षिणा त्या ग्रहाभोवती अधिकाधिक जवळजवळ करत माराव्या लागतात..व अतिशय हळुवारपणे व प्रेमाने त्या ग्रहाजवळ जावे लागते व उतरावे लागते..

हि सर्व त्याची प्रवासाची बेरीज लाखो किलोमीटरच्या आकड्यात जात असते. हे लक्षात घेतल्यावरच समजू शकते कि जरी चंद्र पृथ्वीचं सरळ थेट अंतर फक्त ३,८४००० किमी असलं तरी प्रत्यक्षात चांद्रयानाला त्यावर अलगद उतरायला अजून काही लाख किमी प्रवास करावा लागतो.. म्हणून नुसतं वेग गुणिले अंतर असं गणित नसतं. त्यानंतर रशिया व अमेरीका यांच्यामधे जे कोल्ड वॉर त्याकाळात चालू होते त्या एकमेकांच्या चढाओढीचा परीणाम म्हणून व रशियाचे यान मानव विरहीत होते म्हणून अमेरीकेने १५ जुलै १९६९ ला अपोलो ११ यानातून तीन माणसांनाही पाठवायचा धाडसी निर्णय घेतला. नील आर्मस्ट्रॉंग, बझ ऑल्ड्रीन व तिसरा मायकेल कॉलिन्स..जो यानातच बसुन ते नियंत्रित करत होता.., १५ जुलै १९६९ रोजी रात्री ७.०२ वा निघालेले हे यान ७५ तासांनी २० जुलैला रात्री ८.०८ वा चंद्रावर उतरले होते व अडिच तास तिथे थांबले होते. या प्रवासा दरम्यान या यानाचा सरासरी वेग २४००० किमी प्रती तास इतका होता. तरी पण चंद्रावर पोहचण्यासाठी ७५ तास का लागले हे आपल्याला वरील विश्लेषणावरून समजले असेल.

ताशी २४००० कि मी वेग म्हणजे आपल्या नगरी भाषेत ३० सेकंदात नगरहून मुंबईला जाण्याचा वेग होय. म्हणजे शब्दश: एक मिनिटात मुंबईहुन रिटर्न... विशेष म्हणजे या तीनही अंतराळवीरांना त्यांच्या धाडसी कामगिरीबद्दल त्यांच्या रितसर पगाराव्यतिरिक्त (२०००० डॉलर) कुठलेही जास्तीचे पैसे, बक्षीसे, गाड्या, बंगले, असले लाड केले नाहीत व त्यांनीही करून घेतले नाहीत...नाहीतर आपल्याकडे जमिनीवरची एखादी (फिक्स)मॅच जिंकली तरी करोडो रूपये, महागड्या गाड्या, बंगल्यांची खैरात त्या खेळाडूंवर केली जाते. किंवा कोणी २००-५०० किलोमीटर चारधाम यात्रा वगैरे करून आला कि स्वतः च्या पाया पडुन घेत सुटतो..व आयुष्यभर यात्रेचं वर्णन सांगत बसतो.. किंवा एखादी थुकरट निवडणूक जिंकली तरी जेसीबीने त्याला हार घातला जातो.. असा शेवटी ज्याचा त्याचा मेंदुचा आवाका असतो.

आपण सूर्याला जरी अति उच्च देवाचा दर्जा दिलेला असला तरी तितकाच महत्त्वाचा हा चंद्र आहे.. चंद्र आहे म्हणुन पृथ्वीच अस्तित्व आहे, हे महत्त्व फार कमी लोकांना माहीत असेल, चंद्रामुळेच पृथ्वी साडेतेवीस अंशाने कललेली आहे, चंद्रामुळेच भरती आणि ओहोटी होते, चंद्रामुळेच वर्षभराचे सहा ऋतूंचे सहा सोहळे आणि ऋतुमान बदलतात, चंद्रामुळेच स्वतःभोवती आणि सूर्याभोवती फिरण्याचा पृथ्वीचा वेग नियंत्रित आहे. चंद्र जर नष्ट झाला तर या उपरोक्त सांगितलेल्या सगळ्या गोष्टी अनियंत्रित होऊन पृथ्वी नष्ट व्हायला काही तास सुद्धा लागणार नाहीत, हा खगोलीय भूगोलिय आणि चुंबकीय विज्ञानाचा अभ्यासाचा विषय सामान्यांना माहिती नाही.

शेवटी चंद्र हा पृथ्वीसाठी वरदायी आणि गुढ आकर्षणाचाही विषय आहे. अंतराळ अभ्यासकांचा चंद्र वेगळा असतो, ज्योतिषांचा वेगळा असतो, लेखक कवींचा वेगळा, प्रेमभंग झालेल्यांचा वेगळा प्रेमात पडलेल्यांचा वेगळा, तर मधुचंद्राचा वेगळा चंद्र असतो.. पण पोटात भुक लागलेल्या एखाद्या गरीबाला रात्री स्वतःचेच हात उशाला घेऊन आभाळाकडे पाहताना पौर्णिमेचा चंद्रही भाकरीसारखाच दिसत असेल एवढे मात्र खरे!

लेखक, कवींचा, शास्त्रज्ञांचा, सामान्य माणसांचा, तसच चंद्राला भाऊ मानून छोट्या बाळाला चंदा मामा म्हणून दाखवणाऱ्या लोभस स्त्रीचा आवडता हा चंद्र.. त्यांच्या अप्रतिम उपमांमुळे आणि सौंदर्याच्या वर्णनांमुळेच सर्वप्रथम जगातील वैज्ञानिकांना चंद्रावर जायची उर्मी आली असेल असे उद्गार कुसुमाग्रजानी काढले होते. आजची कोजागिरी त्याच्याविषयी असे सर्व थोडेफार गुण त्याच्या आणि आपल्या अस्तित्वाचे महत्त्व कृतज्ञतेने समजून घेऊन साजरी केली तर अधिक मजा येईल.

सर्वांना कोजागिरीच्या हार्दिक शुभेच्छा!

**लेखक - सुहासभाई मुळे, ९८२३७२२२१२.**

suhasbhai.smgmail.com



मराठवाडा मित्र मंडळ अहिल्यानगरने स्नेहांकुरला मदत देऊन मराठवाडा मुक्ती दिन साजरा केला.

# स्नेहांकुर संस्थेला मदत देऊन 'मराठवाडा मुक्ती दिन' साजरा

नगर - स्वातंत्र्याची यशोगाथा गात असताना समाजातील कमजोर व्यक्तींना सशक्त बनविणे हे आपले कर्तव्य आहे. भारत देश स्वतंत्र झाला परंतू आता या स्वराज्याचे सुराज्य होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. मराठवाडा मित्र मंडळाने आपल्या कार्यकर्तृत्वातुन असा आदर्श घालून दिला असे प्रतिपादन मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया यांनी केले व मराठवाडा मित्रमंडळाच्या आजवरच्या कार्याबद्दल व वाटचालीबद्दल माहिती दिली व स्नेहांकूरच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

स्त्री जन्माचे स्वागत करा या विचारसरणीचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या डॉ. सुधाताई कांकरिया, आंतरराष्ट्रीय किर्तीचे नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया आणि मराठवाडा मित्रमंडळ अहिल्यानगर यांनी या वर्षीचा मराठवाडा मुक्ती दिन साजरा करण्यासाठी अभिनव कल्पना राबविली. शक्तीची उपासना करणार्या नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्नेहालय प्रणित स्नेहांकूर या संस्थेतील नवजात बलिका व बाळांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषण आहाराची पाकिटे व रू.११,००० ची देणगी, डॉ. सौ. सुधाताई कांकरिया आणि डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या हस्ते देण्यात आली. त्यावेळी बोलताना, डॉ. सुधा कांकरिया यांनी संस्थेच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. त्यावेळी त्या बाळांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य पाहून सर्वांच्या मनात संमिश्र भावनांनी गर्दी केली होती. नवरात्रीच्या निमित्ताने घरोघरी प्रज्वलीत होणाऱ्या बालिकारूपी पणत्या म्हणजेच स्नेहांकुरने जपलेला हा स्नेह आहे. या सर्व बालिकांच्या चेहऱ्याचे हास्य हीच समाजाची श्रीमंती आहे असे डॉ. सुधाताई कांकरिया म्हणाल्या. नंदकुमार देशपांडे यांनी भारतीय स्वातंत्र्यानंतर मराठवाड्याला १३ महिन्यांनी मिळालेल्या स्वातंत्र्याचा इतिहास थोडक्यात सांगितला तर सचिव सदाशिव मोहिते यांनी आभार मानले. तेथील व्यवस्थापक बाळासाहेब वारूळे व सेवक वर्गानी संपूर्ण परिसर आस्थेने फिरून दाखविला व सविस्तर माहिती दिली.

यावेळी मराठवाडा मित्र मंडळाचे श्री. व सौ. दरबस्तवार, मनोहर कटके, सौ. सिंधूताई कटके, सौ. छाया देशपांडे सहित मंडळाचे इतर सदस्यही उपस्थित होते.

# महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित शालेय रोलर स्केटिंग स्पर्धेत सर्वाधिक पदकांची कमाई

## स्केटिंग स्पर्धेत टिम टॉपर्स अकॅडमीचा विजय



नगर - महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ऑक्टोबर रोजी म.न.पा. शालेय रोलर स्केटिंग स्पर्धा व विभागस्तरीय निवड चाचणी स्पर्धा उत्साहात पार पडल्या. ११, १४, १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली अशा विविध वयोगटांत तसेच क्वॉड आणि इनलाईन प्रकारांत ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यात टिम टॉपर्स स्केटिंग अॅक्डमीच्या खेळाडूंनी प्रभावी कामगिरी करत सर्वाधिक पदकांची कमाई करून स्पर्धेत आपला दणदणीत विजय मिळविला. यामध्ये अॅक्डमीच्या विजयी खेळाडूंचा निकाल खालील प्रमाणे.

११ वर्षांखालील गट- क्वॉड मुले प्रथम- कार्तिक नन्नावरे (विश्रामबाग शाळा), द्वितीय- देव वर्मा (रामकृष्ण स्कूल), तृतीय- सर्वम ढवळे (रामकृष्ण स्कूल)., ११ वर्षांखालील- इनलाइन मुले. द्वितीय- प्रणीत पोखर्णा (अशोकभाऊ फिरोदिया स्कूल), ११ वर्षांखालील - इनलाइन मुली. तृतीय- जैनब शेख (रामकृष्ण स्कूल),

१४ वर्षांखालील- क्वॉड मुले. प्रथम- सोहम शिंदे (माऊंट लिटर स्कूल), द्वितीय- वैभव पाटोळे (रामकृष्ण स्कूल)., १४ वर्षांखालील- क्वॉड मुली. द्वितीय- स्वरा शिंदे (सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल),

१७ वर्षांखालील- क्वॉड मुले, द्वितीय- संस्कार कुलकर्णी (भाऊसाहेब फिरोदिया शाळा), १७ वर्षांखालील- इनलाइन मुले. तृतीय- कृष्णा सखला (रामकृष्ण स्कूल), तर उत्कृष्ट प्रदर्शन कार्तिक नन्नावरे, सोहम शिंदे आणि वैभव पाटोळे यांनी अतिवेगवान व अचूक खेळाचे प्रदर्शन करीत प्रेक्षकांचे मन जिंकले. त्यांच्या सामन्यांना उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला. विजेत्या सर्व खेळाडूंचा सत्कार उपमहापौर गणेश भोसले यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच अकॅडमीचे पदाधिकारी असिफ इकबाल शेख, प्रविण गायकवाड, संजय नन्नावरे, विशाल साळवे, अक्षय चौधरी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

विजेते खेळाडू आंतरराष्ट्रीय स्केटिंग खेळाडू प्रशांत पाटोळे, प्रदीप पाटोळे आणि पियुष कदम यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली कै. पुंडलिकराव भोसले स्केटिंग रिंग (बुरुडगाव रोड) तसेच जिल्हा क्रीडा संकुल (वाडियापार्क) येथे नियमित सराव करतात.

# सत्य आणि अहिंसेचा विचारच जगात शांतता निर्माण करू शकतो

**विलास नाबदे यांचे प्रतिपादन; अहमदनगर महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन**



अहमदनगर महाविद्यालयात गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान स्व. लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला.

नगर - राष्ट्रपिता महात्मा गांधींचा सत्य आणि अहिंसेचा विचारच जगात शांतता निर्माण करू शकतो. हा विचार मानवतावादी विकासाला पोषक असून, समाजात सहिष्णुता, परस्पर सन्मान आणि शांततापूर्ण सहअस्तित्व यांचा पाया मजबूत करतो. गांधींनी व्यक्तिनिष्ठ राजकारणापेक्षा तत्वनिष्ठ घटकांना प्राधान्य दिले आणि स्वकृतीतून विचार रुजवून स्वातंत्र्याचा लढा यशस्वी केला. गांधीवाद ही फक्त विचार प्रणाली नसून जगातील लोकशाही व्यवस्थेला परिपोषक अशी एक जीवनपद्धती आहे, असे मत गांधी अभ्यास केंद्राचे प्रमुख विलास नाबदे यांनी मार्गदर्शनातून व्यक्त केले.

बी. पी. एच. इ. सोसायटीचे अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथे गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान स्व. लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी गांधी अभ्यास केंद्राचे प्रमुख विलास नाबदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

नाबदे यांनी पुढे सांगितले की, महात्मा गांधींचे मानवतावादी आणि विवेकनिष्ठ विचार नव्या पिढीने अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे. आज भारतीय लोकशाही नैराश्याच्या भवर्यातून जात असताना गांधी तत्त्वेच लोकशाहीला परिपक्वतेच्या मार्गावर नेऊ शकतात. सत्य, अहिंसा, आत्मशुद्धी आणि लोकसहभाग या गांधींच्या चार मूलभूत मूल्यांची अंमलबजावणी प्रत्येक क्षेत्रात झाली, तर देशात खर्या अर्थाने लोकशाही सुदृढ होईल.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नोवेल पारगे होते. त्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, गांधी आणि शास्त्रीजींचे जीवन म्हणजे साधेपणा, प्रामाणिकता आणि सेवाभावाचा आदर्श. आजच्या तरुण पिढीने सोशल मीडियावरील आकर्षणापेक्षा गांधींच्या मूल्यांवर लक्ष केंद्रित करून आपल्या आयुष्याचा मार्ग ठरवावा.

कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा. दिलीप भालसिंग, विनाअनुदान विभागाचे मुख्य समन्वयक डॉ. रज्जाक सय्यद, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुधीर वाडेकर, प्रा. घुले, प्रा. डॉ. माधवराव शिंदे, डॉ. भागवत परकाल, डॉ. सूर्यवंशी मॅडम आणि ग्रंथपाल डॉ. फुगनार आदी उपस्थित होते.

या प्रसंगी विद्यार्थिनी साक्षी भोसले आणि शेख शफा यांनी प्रेरणादायी भाषणे करून गांधी व शास्त्रींच्या जीवनातून शिकण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पूनम घोडके यांनी केले. अजय बनसोडे यांनी आभार मानले.

शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

गांधी आणि शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून महाविद्यालयाने सत्य, अहिंसा आणि प्रामाणिकता या मूल्यांचा संदेश समाजात पोहोचवला. विद्यार्थ्यांनी प्रदर्शन, भाषण आणि चर्चेद्वारे गांधी व शास्त्रींच्या विचारांना नव्या पिढीसमोर सजीव करण्याचा प्रयत्न केला.



पी.ए.इनामदार शाळेत चित्रकला स्पर्धा विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

# पी.ए.इनामदार शाळेत चित्रकला स्पर्धा विजेत्यांचा गौरव

**रंग उत्सव सेलिब्रेशन व नवनीत युथ ऑल इंडिया कॉम्पिटिशनमध्ये २७ सुवर्णपदक, १४ रौप्यपदक, १० कांस्यपदक**

नगर - इकरा एज्युकेशन अॅण्ड वेल्फेअर सोसायटी संचालित येस पी.ए. इनामदार शाळेत चित्रकला स्पर्धा विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

स्कूलमध्ये रंग उत्सव सेलिब्रेशन मुंबई तसेच नवनीत युथ ऑल इंडिया ड्रॉइंग कॉम्पिटिशन या चित्रकला स्पर्धांमध्ये एकूण ५०० विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांची निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून अनेक बक्षिसे जिंकली आहेत. शाळेत या विजेत्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. यामध्ये प्रथम क्रमांक अक्सा शहबाज तांबोळी यास स्केट इलेक्ट्रॉनिक स्कूटर, द्वितीय क्रमांक पठाण मसीरा मोहसीन स्केच बुक अॅण्ड ग्राफिक पेन्सिल रायटिंग पॅड, याशिवाय पी.ए.इनामदार शाळेला २७ सुवर्णपदक, १४ रौप्यपदक, १० कांस्यपदक, आकर्षक ट्रॉफीज व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या प्रसंगी शाळेचे प्राचार्य युनूस ए.के., उपप्राचार्य शेख फरहाना एजाज, संचालक शब्बीर सर, इक्रा स्कूलचे संपूर्ण व्यवस्थापन, समन्वयक आमिर खान, चित्रकला शिक्षक तसेच इतर शिक्षक उपस्थित होते.



जगदंबा मातेच्या मंदिरात होम-हवनाने निमगाव वाघा येथे नवरात्रोत्सवाची सांगता करण्यात आली.

# जगदंबा मातेच्या मंदिरात होम-हवनाने नवरात्रोत्सवाची सांगता

नगर - निमगाव वाघा येथील जगदंबा मातेच्या मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता होम-हवनाने वेद मंत्रोच्चारांच्या गजरात झाली. मंदिर परिसर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत जगदंबा मातेच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दररोज सकाळी व संध्याकाळी आरती, पूजा, देवी चालीसा, हरीपाठ, भजन-कीर्तन आणि भक्तिगीतांचे कार्यक्रम भक्तिभावात पार पडले. संपूर्ण उत्सव काळात पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. दररोज महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. गावापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर डोंगराच्या पायथ्याशी वसलेले जगदंबा मातेचे मंदिर हे स्थानिकांसाठी श्रद्धेचे केंद्र आहे. या मंदिराचे जीर्णोद्धार पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या धर्तीवर करण्यात आले असून, त्याला जागृत देवस्थान म्हणून ख्याती आहे.

या धार्मिक उत्सवाच्या सांगता सोहळ्याला सरपंच उज्वला कापसे, उपसरपंच किरण जाधव, ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, अरुण कापसे, बापू फलके, शिवाजी जाधव, अतुल फलके, सुनिता जाधव, सागर कापसे, मिरा जाधव, ज्योती फलके, नवनाथ हारदे, भरत बोडखे, एकनाथ जाधव, कुमार फलके, अनिल डोंगरे, संग्राम केदार, अनिल पाटील फलके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. भक्तांनी देवीसमोर मनोभावे नवस फेडले, यावेळी भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच सामुदायिक सिमोल्लंघनाचा कार्यक्रम पार पडला

# मानवसेवेतील अद्वितीय योगदानासाठी संत निरंकारी मिशनला विशेष सन्मान प्रदान



मानवसेवेतील अद्वितीय योगदानासाठी जम्मू व कश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हाजी यांनी संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा यांना मिशनच्या या निःस्वार्थ सेवेबद्दल विशेष सन्मान प्रदान केला.

नगर - गांधी जयंतीच्या निमित्ताने श्रीनगर येथे गांधी ग्लोबल फॅमिलीच्या वतीने एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाची अध्यक्षता पद्मश्री डॉ. एस. पी. वर्मा यांनी केली. या कार्यक्रमात अनेक संस्थांनी देखील सहभाग घेतला. या प्रसंगी संत निरंकारी मिशनला मानवसेवेतील अद्वितीय योगदानासाठी विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.

मानवाला मानव प्रिय असावा, एकमेकांचा आधार बनावाया मूलभूत सिद्धांत प्रमाणे मानवतेच्या निःस्वार्थ सेवेच्या मार्गावर अग्रेसर संत निरंकारी मिशन, सतगुरु माता सुदीक्षा महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली निरंतर समाजकल्याणाचे कार्य समर्पण भावनेने करत आहे. मिशनद्वारे केली जाणारी ही सेवा संपूर्ण विश्व एक कुटुंब या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्याचा सशक्त व यशस्वी प्रयास आहे.

तसेच मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनद्वारे वेळोवेळी अनेक सामाजिक उपक्रम तसेच शिबिरे आयोजित केली जातात. ज्यात पर्यावरण संरक्षण, आरोग्य सेवा, रक्तदान, स्वच्छता अभियान तसेच आपत्ती निवारण अशा क्षेत्रांत संपूर्ण भारतभर मिशन निरंतर कार्य करत आहे जे उल्लेखनीय व अनुकरणीय आहे.

जम्मू-कश्मीरमध्ये आलेल्या नैसर्गिकआपत्तीत जसे की पूर, ढगफुटी आणि ऑपरेशन सिंदूरच्या काळात मिशनने अत्यंत संवेदनशीलता व तत्परतेने मदतकार्य केले. प्रभावित कुटुंबांपर्यंत अन्नधान्य, औषधे व आवश्यक मदत पोहोचवून मिशनने पुन्हा एकदा सिद्ध केले, की ते मानव सेवेच्या प्रत्येक कार्यासाठी सदैव तत्पर व सक्रिय आहेत. या सेवांची भरपूर प्रशंसा वेळोवेळी समाजातील विविध घटकांसह शासनानेही केली.

याच क्रमात, शेर-ए-कश्मीर आंतरराष्ट्रीय संमेलन केंद्र, श्रीनगर येथे आयोजित भव्य समारंभात जम्मू व कश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा यांना मिशनच्या या निःस्वार्थ सेवेबद्दल विशेष सन्मान प्रदान केला.

सन्मान स्वीकारताना जोगिंदर सुखीजा म्हणाले, की संत निरंकारी मिशन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या प्रेरणेने सदैव समाजकल्याण आणि मानव सेवेप्रति कटिबद्ध आहे. आमचे प्रत्येक कार्य सेवा, समर्पण आणि एकत्व या सिद्धांतांवर आधारित आहे. नैसर्गिक आपत्ती-मधील मदतकार्य असो वा रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमांतील सहभाग असो, या सगळ्यात मिशन नेहमीच अग्रेसर राहिले आहे. आमचा उद्देश प्रत्येक मानवापर्यंत प्रेम, शांती आणि ऐकतेचा संदेश पोहोचवणे हा आहे.

निःसंशयपणे, गांधी जयंतीच्या या स्मरणीय प्रसंगी संत निरंकारी मिशनचा सहभाग व मिशनला मिळालेला सन्मान हे दोन्ही सुद्धा समाजाप्रतीच्या मिशनच्या समर्पण, निःस्वार्थ सेवा आणि विश्वबंधुत्वाच्या भावनेचे उज्वल प्रतीक आहे. हे मिशन आजही त्याच आदर्श मार्गावर वाटचाल करत आहे, जिथे मानवता सर्वोतोपरी आहे.

# अर्थजगत

**क्रेडिट कार्ड ईएमआय ही अशी एक सोय आहे ज्यामुळे थकबाकी रक्कम हप्त्यांमध्ये भरता येते. जे लोक खरेदी करण्याची आवड आवरू शकत नाहीत किंवा मोठ्या किंमतीची वस्तू विकत घेत आहेत, त्यांच्यासाठी ही पर्याय स्वरूपातील 'कर्ज' मानली जाऊ शकते. क्रेडिट कार्डची ही सुविधा त्या लोकांसाठी उपयुक्त ठरते ज्यांच्याकडे तत्काळ निधी नाही किंवा बिल तयार होताना संपूर्ण रक्कम भरण्यासाठी पुरेसे पैसे नाहीत. मात्र, कर्जाच्या जाळ्यात अडकू नये म्हणून क्रेडिट कार्ड ईएमआयची प्रक्रिया कशी चालते हे समजून घेणे आवश्यक आहे. कारण या सुविधेत प्रक्रिया शुल्क आणि व्याज आकारले जाते, त्यामुळे आपला मासिक खर्च किती होईल याचा अंदाज लावणे आवश्यक आहे. त्यासाठी क्रेडिट कार्ड ईएमआय कॅल्क्युलेटरचा वापर करून आधीच अंदाज घेणे महत्त्वाचे आहे.**

*सध्याच्या काळात कार ही चैन न राहता अनेकांसाठी गरज तसेच ती लाइफस्टाइल आणि स्टेटसचे प्रतीक म्हणून ओळखली जाते. असे असले तरी अनेक वेळा लोक कार खरेदी करताना आपल्या उत्पन्नाचा विचार करत नाहीत. केवळ प्रवाहाचा भाग म्हणून किंवा प्रतिष्ठेसाठी कार खरेदी करतात. पण यामुळे भविष्यात अडचणी येऊ शकतात. हे टाळण्यासाठी कार घेताना भविष्यात हप्त्याचा, मेंटेनन्सचा आपल्या मासिक बजेटवर आणि बचतीवर किती परिणाम होईल याचे आकलन करुन मगच निर्णय घेतला पाहिजे.*

## कारखरेदी करतानाचा अर्थविचार



सर्वप्रथम एक गोष्ट लक्षात घ्या की, कार ही एक असेट असून तिची किंमत सतत कमी होते आणि तिचा मेंटेनन्स खर्च वेळोवेळी वाढतो. तज्ज्ञांचे मत आहे की, नीट नियोजन न करता कार खरेदी केल्यास बचत आणि गुंतवणूक योजना बिघडू शकतात. प्रश्न असा आहे कीह्ण आपल्या उत्पन्नाच्या तुलनेत कार किती महागडी असावी? ईएमआयचा भार किती असावा?

सर्टिफाइड फाइनान्शियल प्लॅनर तारेश भाटिया सांगतात की, कारशी संबंधित सर्व खर्च म्हणजे ईएमआय, विमा, इंधन, पार्किंग आणि मेंटेनन्स हे मासिक नेट इनकमच्या १५ ते २०टक्क्यांहून अधिक नसावे. उदाहरणार्थ, जर मासिक पगार ₹८०,००० असेल, तर कारवर एकूण खर्च ₹१२,००० ते ₹१६,००० दरम्यान असावा.

त्याचप्रमाणे, घराचे कर्ज, शिक्षण कर्ज किंवा इतर कर्जाचे हप्ते यांचा एकूण भार नेट इनकमच्या ३५ टक्क्यांपेक्षा जास्त जाऊ नये. उदाहरणार्थ, मासिक इनकम ₹१ लाख असेल आणि होम लोनचा हप्ता २५,००० रुपये असेल, तर कारचा ईएमआय १० ते १२ हजारांपेक्षा जास्त नसावा. यापेक्षा जास्त गेल्यास इतर आवश्यक खर्च आणि बचतीवर परिणाम होऊ लागतो.

**ईएमआय रिझर्व्ह का गरजेचा?**

कार लोन ही अनेक वर्षांची जबाबदारी असते. नोकरी बदल, आरोग्य समस्या किंवा आकस्मिक परिस्थितीत आर्थिक अडचण आल्यास ईएमआय चुकण्याचा धोका असतो. यामुळे आपल्याला दंड, क्रेडिट स्कोअरवर परिणाम यांसारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. यापासून बचावासाठी, ज्या खात्यातून ईएमआय कापला जातो, त्या किमान तीन महिन्यांचा ईएमआय रिझर्व फंड ठेवणे आवश्यक आहे. ही सवयमानसिक शांतता देते आणि क्रेडिट स्कोअर व बँकिंग रेकॉर्डही मजबूत करते.

कारची निवड जीवनाच्या गरजांनुसार करावी. शहरातील व्यावसायिकांना फ्युएल एफिशियंसी आणि सहज पार्किंग हे निकष महत्त्वाचे ठरतात; तर कुटुंबांसाठी सुरक्षा आणि जागा यांचा विचार गरजेचा ठरतो.

कारचा बजेट ठरवताना इतर मोठी लक्ष्ये विचारात घ्यावीत. भविष्यात घर खरेदी करायचे असेल किंवा मुलांच्या शिक्षणासाठी पैसे जमवायचे असतील, तर कारवर जास्त खर्च केल्यास हे ध्येय पूर्ण करणे कठीण होऊ शकते. कार लोनचा व्याजदर साधारणपणे ९ ते १० टक्के असतो. इक्विटी म्युच्युअल फंड्समधून दीर्घकाळात सरासरी १२ ते १४ टक्के रिटर्न मिळू शकते. याचा अर्थ असा की, जर खूप महाग लोन घेतल्यास ईएमआय वाढेल आणि गुंतवणुकीची क्षमता कमी होईल. भाटिया यांचा सल्ला आहे की, ईएमआय मर्यादित ठेवा, जेणेकरुन एसआयपी आणि इतर गुंतवणूक योजना सुरू राहतील.

***■ कार ही डिप्रिसिएटिंग असेट आहे. नव्या कारची किंमत पहिल्या वर्षात १५ ते २० टक्के आणि पाच वर्षांत जवळजवळ अर्धी होऊन जाते. मेंटेनन्स खर्च दरवर्षी वाढतो. जर आधीच रिप्लेसमेंट किंवा मेंटेनन्स फंड ठेवला असेल, तर भविष्यात कार बदलताना नवीन महाग लोन घेण्याची गरज कमी होते. लग्झरी किंवा हाय-एंड कारची इच्छा नैसर्गिक आहे, पण त्याआधी वित्तीय आधार मजबूत असणे गरजेचे आहे. म्हणजे इमर्जन्सी फंड, तीन ईएमआय रिझर्व फंड आणि एकूण लोन नेट इनकमच्या ३५% पेक्षा जास्त नसावे. कार बजेटच्या बाहेर असेल, तर मोठे डाऊनपेमेंट करा.***

## क्रेडिट कार्ड थकबाकीसाठी ईएमआय सुविधा वापरताना...




क्रेडिट कार्डचे बिल चुकवण्याचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

सर्वात पहिला आणि आर्थिक दृष्ट्या योग्य पर्याय म्हणजे संपूर्ण बिलाची रक्कम देय तारखेआधी भरणे. हा सोपा आणि स्पष्ट मार्ग आहे. तुम्ही बिलावर जेवढं दिसतं तेवढंच भरता आणि त्यावर व्याज लागत नाही.

दुसरा मार्ग म्हणजे किमान देय रक्कम किंवा त्याहून जास्त काही रक्कम भरणे. उरलेली मूळ थकबाकी पुढील बिलिंग सायकलमध्ये नेली जाते आणि ती पूर्ण फेडेपर्यंत त्यावर व्याज लागत राहते.

तिसरा पर्याय म्हणजे संपूर्ण थकबाकीला ईएमआय म्हणजेच समसमान मासिक हप्त्यांमध्ये रूपांतर करणे. ही क्रेडिट कार्डवरील सोय प्रत्यक्षात वैयक्तिक किंवा गृहकर्जाप्रमाणेच असते. यात व्याजदर आणि प्रक्रिया शुल्क आकारले जाते व तुम्हाला ठराविक मुदतीत मोठी रक्कम हप्त्यांमध्ये फेडावी लागते. मुदत तीन, सहा, नऊ किंवा बारा महिने असू शकते.

ही रूपांतरण प्रक्रिया मोफत नसते आणि त्यावेळी क्रेडिट कार्ड ईएमआय कॅल्क्युलेटरचा उपयोग होतो. अटी व शर्ती तसेच प्रत्येक हप्त्याची रक्कम किती आहे हे स्पष्टपणे समजणे आवश्यक असते.

**क्रेडिट कार्ड ईएमआय कसे काम करते?**

क्रेडिट कार्ड वापरकर्त्यांना अनेक फायदे देतात, मात्र काही तोटेही असतात. लोक अनेकदा अंदाजापेक्षा जास्त खर्च करतात. जर तुम्ही आपल्या क्षमतेपेक्षा जास्त खर्च केला आणि देय रक्कम भरू शकलात नाही, तर व्याज वाढू लागते आणि कर्जाचे ओझे वाढते.

ईएमआयचा पर्याय या वाढत्या व्याजापासून आणि साचलेल्या थकबाकीपासून थोडा दिलासा देतो आणि तुमची आर्थिक परिस्थिती बिघडू देत नाही.

**क्रेडिट कार्ड ईएमआयचे प्रकार आणि स्वरूप**

प्रत्येक क्रेडिट कार्ड कंपनीकडे रूपांतरणाचे वेगवेगळे पर्याय असतात तसेच वेगवेगळे व्याजदर आणि शुल्क असते. तुम्ही कोणता पर्याय निवडत आहात हे नीट समजून घेतले तर योग्य आर्थिक निर्णय घेता येतो.

साधारणपणे दोन प्रकारचे ईएमआय असतात. शून्य व्याजदराचे ईएमआय आणि कमी व्याजदराचे ईएमआय.

■ नो-कॉस्ट ईएमआय हा शून्य व्याजदर असलेला ईएमआय असतो. काही क्रेडिट कार्ड कंपन्या यावर प्रक्रिया शुल्क आकारतात, जे अतिशय कमी असते. त्यामुळे हा पर्याय म्हणजे जणू व्याजमुक्त कर्जच ठरतो. ईएमआय घेऊ इच्छिणाऱ्या लोकांसाठी हा एक उत्तम पर्याय असतो.

■ लो-कॉस्ट ईएमआय हा कमी व्याजदराचा ईएमआय असतो. यामध्ये व्याजदर साधारणपणे प्रतिमहिना १.२५ टक्के ते १.९९ टक्के दरम्यान असतो. हा दर मुदत चुकवल्यावर किंवा थकबाकीवर लागणाऱ्या व्याजापेक्षा खूपच कमी असतो. मात्र, या व्याजाव्यतिरिक्त प्रक्रिया शुल्कही आकारले जाते.

**अतिरिक्त खर्च :** क्रेडिट कार्डवरील थकबाकीला ईएमआयमध्ये रूपांतरित करताना काही अतिरिक्त खर्चही करावा लागतो. प्रोसेसिंग फी (प्रक्रिया शुल्क): थकबाकीला सोप्या हप्त्यांत रूपांतरित करताना कंपन्या एकदाच आकारलेले शुल्क घेतात. हे शुल्क ठराविक रक्कम किंवा एकूण रकमेच्या टक्केवारीप्रमाणे असते.

**क्रेडिट लिमिटमध्ये घट :** तुमच्या कार्डची मर्यादा मूळ थकबाकीच्या रकमेने कमी होते. जेव्हा-जेव्हा तुम्ही हप्ता फेडता, तेव्हा तेवढी रक्कम परत उपलब्ध होते. उदाहरणार्थ, जर कार्ड मर्यादा १,५०,००० रुपये असेल आणि तुम्ही ७५,००० रुपयांचा फोन सहा महिन्यांच्या ईएमआयवर घेतलात, तर तुमची मर्यादा लगेच ७५,००० रुपयांवर येईल. प्रत्येक हप्ता फेडल्यानंतर मर्यादा वाढत जाईल आणि सहा महिन्यांनी ती पुन्हा १,५०,००० रुपयांवर पोहोचेल.

**किमान देय रक्कम :** तुमचा ईएमआय हप्ताही बिलावर दिसणाऱ्या किमान देय रकमेचा भाग असतो. एकदा ईएमआय घेतल्यावर तो टाळणे शक्य नसते.

**इतर बाबी :** सर्वच वस्तूंसाठी ईएमआय रूपांतरणाची सोय उपलब्ध असेलच असे नाही. काही वस्तूंसाठी ठराविक किंमतीपेक्षा जास्त रक्कम असणे आवश्यक असते. त्यामुळे आपल्या कार्ड प्रदात्याकडे याबाबत आधीच चौकशी करणे हिताचे आहे. अन्यथा मोठ्या बिलात अडकून परतफेड करणे कठीण होऊ शकते.

## पर्सनल लोन घेताना इन्शुरन्स बंधनकारक आहे ?




पर्सनल लोन घेताना अनेकदा बँक किंवा कर्ज देणारी संस्था आपल्याला इन्शुरन्स घेण्याचा सल्ला देते किंवा काही वेळा ते कर्जाच्या अटीत समाविष्ट केले जाते. त्यामुळे अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की पर्सनल लोनसाठी इन्शुरन्स बंधनकारक आहे का आणि ते खरंच आवश्यक आहे का. या संदर्भात पर्सनल लोन इन्शुरन्स म्हणजे काय, ते आवश्यक आहे का, बँका किंवा एनबीएफसी ते का सुचवतात आणि त्याचे फायदे-तोटे काय आहेत, हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

पर्सनल लोन इन्शुरन्स, ज्याला लोन पेमेंट प्रोटेक्शन इन्शुरन्स असेही म्हटले जाते, हे मूलतः अशा परिस्थितीत उपयुक्त ठरते जेव्हा आपण आपले कर्ज परतफेड करू शकत नाही. नोकरी जाणे, गंभीर आजार, अपघात किंवा मृत्यू यांसारख्या प्रसंगी हे इन्शुरन्स कर्जाची संपूर्ण रक्कम किंवा काही भाग बँकेला आपल्याऐवजी परतफेड करते. त्यामुळे अशा वेळी आपल्या कुटुंबावर परतफेडीचा आर्थिक भार येत नाही आणि सुरक्षितता मिळते.

भारतात कायद्याने पर्सनल लोन इन्शुरन्स घेणे बंधनकारक नाही. कोणतीही व्यक्ती इन्शुरन्सशिवाय पर्सनल लोन घेऊ शकते. परंतु अनेक बँका किंवा एनबीएफसी ते ग्राहकांना घेण्याचा सल्ला देतात आणि काही वेळा स्पष्ट न सांगता कर्ज पॅकेजमध्ये सामावून घेतात. त्यामुळे कर्जाचे दस्तऐवज नीट वाचणे अत्यंत गरजेचे ठरते.

लोन इन्शुरन्स सुचवण्यामागे बँकांचा हेतू म्हणजे त्यांच्या पैशाचे संरक्षण करणे हा असतो. ग्राहकाला काही अडचण आली तर इन्शुरन्स कंपनी परतफेड करते, वसुलीची समस्या टळते आणि बँकेचे कर्ज सुरक्षित राहते. शिवाय काही बँकांना इन्शुरन्स विक्रीतून कमिशनही मिळते. मात्र इन्शुरन्स घेणे हा पूर्णपणे ग्राहकाचा निर्णय असतो, बंधनकारक नाही.


पर्सनल लोन इन्शुरन्सचे काही फायदे असे की नोकरी जाणे किंवा मृत्यू अशा दुर्दैवी प्रसंगी आपल्या कुटुंबावर परतफेडीची जबाबदारी येत नाही. यामुळे क्रेडिट स्कोअर सुरक्षित राहतो कारण ईएमआय थकित होण्याचा धोका टळतो. काही पॉलिसी हॉस्पिटल खर्च, अपघात किंवा आजारपण यांनाही कव्हर करतात. तसेच आवश्यक कागदपत्रे सादर केल्यास दावा प्रक्रिया साधी असते.

इन्शुरन्सचा खर्च कर्जाची रक्कम, मुदत, आपले वय-आरोग्य व कव्हरेज प्रकार यावर अवलंबून असतो. साधारणपणे एकदाच प्रीमियम भरावा लागतो आणि तो कर्जाच्या रकमेतीलच जोडला जातो. त्यामुळे ईएमआय किंचित वाढतो. अनेक बँक व इन्शुरन्स संकेतस्थळांवर कॅल्क्युलेटर उपलब्ध असतात ज्यातून नेमका खर्च समजू शकतो. म्हणून इन्शुरन्स घेण्याआधी वेगवेगळे पर्याय तुलना करणे योग्य ठरते.

तथापि काही प्रसंगी हे इन्शुरन्स घेणे फारसे फायदेशीर ठरत नाही. उदाहरणार्थ, आपल्याकडे आधीच लाईफ इन्शुरन्स किंवा हेल्थ इन्शुरन्स असल्यास वेगळे पॉलिसी घेण्याची गरज नसते. कर्जाची रक्कम कमी असेल किंवा कालावधी फारच लहान असेल तर हे इन्शुरन्स विशेष उपयोगी नाही. आर्थिकदृष्ट्या आपण सक्षम असाल आणि पुरेशा बचतीतून कर्ज फेडू शकत असाल तर अशा पॉलिसीवर पैसा खर्च करण्याचे औचित्य नाही. तसेच प्रीमियम खूप जास्त असेल तरही ते घेणे टाळावे.

एकूणात, भारतात पर्सनल लोन इन्शुरन्स घेणे बंधनकारक नसले तरी काही प्रसंगी ते उपयुक्त ठरते. त्यामुळे स्वतःच्या परिस्थितीचा विचार करूनच निर्णय घ्यावा. अटी-शर्ती नीट वाचूनच योग्य पर्याय निवडणे गरजेचे आहे.

## कर्जासाठी 'रेपो लिंक्ड'चा पर्याय फायदेशीर आहे का?




भारतीय रिझर्व्ह बँकेने यंदाच्या पतधोरण समितीच्या बैठकीत रेपो रेट ५.५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. तज्ज्ञांच्या मते जे लोक अजूनही एमसीएलआर किंवा बेस रेटवर लोन घेत आहेत, त्यांनी रेपो-लिंक्ड लोनमध्ये स्विच करण्याचा विचार करण्याची गरज आहे. ग्राहकांनी त्यांचे लोन रेपो-लिंक्ड आहे की नाही हे तपासले पाहिजे.

गृहकर्ज देणाऱ्या बँका किंवा वित्तसंस्था कर्जाच्या व्याजदरासाठी दोन प्रमुख प्रकार वापरतात. पहिला म्हणजे रेपो लिंक्ड लेंडिंग रेट (आरएलएलआर) आणि दुसरा मार्जिनल कॉस्ट ऑफ फंड बेस्ड लेंडिंग रेट (एमसीएलआर) या दोन्ही संकल्पना नीट समजून घेणे आवश्यक आहे, जेणेकरून कर्जदारांना आपला होम लोन अधिक स्पष्टपणे समजेल.

**आरएलएलआर म्हणजे काय?**

रेपो लिंक्ड लेंडिंग रेट हे नावाप्रमाणेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या रेपो रेटशी थेट जोडलेले असते. रेपो रेटमध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार हा दर बदलतो. प्रत्येक बँकेचा आरएलएलआर वेगळा असतो. कर्जाची रक्कम किती आहे, कर्जदार कोणत्या जोखीम गटात येतो, लोन-टू-वॅल्यू प्रमाण किती आहे यांसारख्या बाबींवर हा दर अवलंबून असतो. जर कर्ज रेपो लिंक्ड दरावर दिले गेले असेल, तर रेपो रेट कमी-जास्त झाल्यावर गृहकर्जाचा व्याजदरही थेट कमी-जास्त होतो.

आरएलएलआर मोजण्याची पद्धत सोपी आहे. आरएलएलआर = रेपो रेट + स्प्रेड. रेपो रेट म्हणजे बँका रिझर्व्ह बँकेकडून ज्या दराने कर्ज घेतात तो दर. स्प्रेड म्हणजे बँका आपला संचालन खर्च आणि नफा लक्षात घेऊन लावलेली अतिरिक्त टक्केवारी. त्यामुळे रेपो रेट बदलल्यास कर्जदाराचा व्याजदर लगेच बदलतो. यामुळे आरएलएलआर पारदर्शक आणि जलदगतीने बदलणारा दर मानला जातो. एमसीएलआरच्या तुलनेत तो अधिक गतिमान आहे.

**एमसीएलआर म्हणजे काय?**

दुसरीकडे, एमसीएलआर म्हणजे मार्जिनल कॉस्ट ऑफ फंड बेस्ड लेंडिंग रेट. हा तो किमान दर आहे ज्याखाली बँक आपल्या ग्राहकांना कर्ज देऊ शकत नाही. हा दर बँक स्वतःच्या निधीच्या खर्चावर आधारित ठरवते, मात्र त्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे पालन करावे लागते. म्हणजेच बँक आपल्या ठेवी, बचत खात्यांवरील व्याज, इतर कर्जे व मुदत ठेवी यांचा सरासरी खर्च, संचालन खर्च तसेच कालावधीवर आधारित प्रीमियम या घटकांचा विचार करून एमसीएलआर ठरवते.

या दरावर साधारणपणे एक मर्यादित वाढ म्हणजे स्प्रेड जोडला जातो आणि त्यानंतरच कर्जदाराचा प्रत्यक्ष व्याजदर ठरतो. त्यामुळे कर्जदाराचा क्रेडिट स्कोअर, बँकेचा धोका आदी बाबींवर व्याजदर थोडा वरखाली होतो. एमसीएलआर दर महिन्याला किंवा तिमाहीला बदलू शकतो. त्यामुळे कर्जाचा हप्ता काही काळ स्थिर राहतो आणि नंतर बदलतो. जर एमसीएलआर खाली आला तर व्याजदर आणि ईएमआय कमी होतात, पण दर वाढल्यास कर्जदारावर हप्त्याचा भार वाढतो.

आरएलएलआर हा बाह्य बेंचमार्क म्हणजेच थेट रेपो रेटशी जोडलेला असल्याने रेपो रेटमधील बदल लगेचच कर्जदाराला जाणवतो. यामध्ये दर तीन महिन्यांनी पुनर्नियोजन केले जाते, म्हणजेच तीन महिन्यांनी कर्जाचा हप्ता बदलू शकतो. एमसीएलआर मात्र बँकेच्या अंतर्गत खर्चावर ठरतो आणि त्याचा पुनर्नियोजन कालावधी साधारणतः सहा महिने किंवा एक वर्ष असतो. त्यामुळे कर्जदारांना बदलाचा परिणाम उशिराने जाणवतो. रेपो रेटमधील कपात आरएलएलआर मधून लवकर पोहोचते, तर एमसीएलआरमध्ये ती हळूहळू पोहोचते. रेपो रेट कमी होण्याची शक्यता वाटत असेल, तर आरएलएलआर निवडणे योग्य ठरते. कारण रेपो रेट कमी झाल्यावर त्याचा त्वरित फायदा कर्जदाराला मिळतो आणि हप्ते कमी होतात. पण रेपो रेट वाढल्यास त्याच वेगाने हप्त्यांवर भार वाढतो. दुसरीकडे, एमसीएलआर हा तुलनेने स्थिर पर्याय आहे. रेपो रेट वाढण्याची शक्यता जास्त वाटत असेल, तर एमसीएलआरमुळे थोडा वेळ मिळतो आणि हप्त्यांवरील वाढ तत्काळ होत नाही.

## भारतात सोनं खरेदीवर करसवलत मिळते का?




सोनं खरेदी करताना वस्तू आणि सेवा कर म्हणजेच जीएसटी लागू होतो. सध्या भारतात दागिन्यांच्या स्वरूपातील सोनं खरेदीवर ३ टक्के जीएसटी आकारला जातो. जर सोन्याच्या दागिन्यांमध्ये अतिरिक्त मेकिंग चार्जेस असतील तर त्या मेकिंग चार्जेसवर देखील जीएसटी भरावा लागतो. याशिवाय, जर सोनं आयात करून विकले जात असेल तर आयात शुल्कसुद्धा लागू होते. म्हणजेच प्रत्यक्ष बाजारात ग्राहकाला मिळणाऱ्या सोन्याच्या किंमतीत मूळ सोन्याची किंमत, आयात शुल्क, जीएसटी आणि मेकिंग चार्जेस या सगळ्यांचा समावेश होतो.

करसवलतीचा प्रश्न उभा राहतो तेव्हा साधारणपणे आयकर कायद्याच्या तरतुदींकडे लक्ष द्यावे लागते. आयकर कायद्यानुसार सोनं ही भांडवली मालमत्ता मानली जाते. म्हणजेच सोनं विकत घेतल्यावर लगेच कोणतीही करसवलत मिळत नाही. उलट, सोनं विकताना त्यातून नफा झाला असेल तर त्यावर कॅपिटल गेन्स टॅक्स भरावा लागतो.

यामध्ये दोन प्रकारांचा विचार केला जातो. सोनं खरेदी करून तीन वर्षांच्या आत विकले गेले, तर मिळणारा नफा हा शॉर्ट टर्म कॅपिटल गेन म्हणून मोजला जातो आणि तो उत्पन्नात जमा करून त्यावर आयकराच्या नियमित स्लॅबप्रमाणे कर आकारला जातो. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने दोन वर्षे ठेवून विकलेले सोनं ३० टक्के करस्लॅबमध्ये येत असेल तर त्या नफ्यावर ३० टक्के कर लागेल. पण जर सोनं तीन वर्षांहून अधिक काळ ठेवून विकले, तर त्यावर लॉंग टर्म कॅपिटल गेन टॅक्स लागू होतो. यामध्ये निर्देशांक पद्धतीने सुधारित किंमत मोजली जाते आणि त्यावर साधारण २० टक्के कर आकारला जातो.

येथे लक्षात घेण्यासारखा मुद्दा म्हणजे आयकर कायद्यानुसार काही विशेष प्रसंगी सवलती मिळतात. उदाहरणार्थ, आयकर कायद्यातील कलम ५४एफ (झालींळेप ५४त्र) नुसार जर सोनं विकून मिळालेला दीर्घकालीन नफा ठराविक कालावधीत निवासी घर खरेदी किंवा बांधकामासाठी वापरला, तर त्या नफ्यावर करसवलत मिळू शकते. मात्र ही सवलत थेट सोनं खरेदी करताना मिळत नाही, तर सोनं विकल्यानंतर नफा योग्य ठिकाणी गुंतवला तरच लागू होते.

याव्यतिरिक्त गोल्ड ईटीएफ किंवा म्युच्युअल फंडाच्या सोन्याशी निगडित योजनांमध्ये गुंतवणूक केली, तरीही भांडवली नफ्याचे नियम लागू होतात. त्यामुळे येथे थेट खरेदी करताना करसवलत नसली तरी गुंतवणूक दीर्घकालीन असेल आणि विक्रीनंतर नफा इतर भांडवली मालमत्तेत गुंतवला, तर काही सवलत मिळू शकते. आयकर विभागाच्या नियमांनुसार सोनं खरेदीसाठी कोणत्याही प्रकारची थेट करसवलत उपलब्ध नाही. जसे पीपीएफ, एलआयसी, एनएससी किंवा निवृत्तीवेतन निधीत गुंतवणूक केली असता कलम ८०सी अंतर्गत करसवलत मिळते, तसे सोनं खरेदीवर कोणतीही करसवलत नाही. यामुळे गुंतवणूकदारांनी सोनं खरेदी करताना करसवलतीच्या अपेक्षेने न जाता, ते सुरक्षित मालमत्ता म्हणूनच पाहणे योग्य ठरेल.

## लेखाजोखा विमा कंपन्यांविरुद्धच्या तक्रारींचा

**आपण मोठ्या आशांबरोबर हेल्थ इन्शुरन्स पॉलिसी घेतो, दरवर्षी तिचा हप्ता भरतो; पण जेव्हा एखादी वैद्यकीय आणीबाणी येते आणि आपल्याला रुग्णालयात भरती व्हावे लागते, तेव्हा विमा कंपनी आपला दावा (क्लेम) पूर्णपणे नाकारते किंवा इतके कमी पैसे देते की रुग्णालयाचे जास्तीतजास्त बिल आपल्यालाच भरावे लागते.... दरवर्षी हजारो पॉलिसीधारक विमा कंपन्यांच्या या भूमिकेमुळे त्रस्त होऊन विमा लोकपाल (इन्शुरन्स ऑम्बडस्मन) यांच्याकडे तक्रार करतात. अलीकडेच विमा लोकपाल परिषदेचा (सीआयओ) २०२३-२४ चा वार्षिक अहवाल प्रकाशित झाला असून त्यामध्ये सर्वाधिक तक्रारी नोंदवल्या गेलेल्या हेल्थ इन्शुरन्स कंपन्यांबाबत खुलासा करण्यात आला आहे.**

**कोणत्या कंपन्यांविरुद्ध सर्वाधिक तक्रारी आहेत?**

या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२३-२४ दरम्यान स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्सविरुद्ध सर्वाधिक तक्रारी नोंदवल्या गेल्या असून त्यांची संख्या १३३०८ इतकी आहे. आश्चर्याची बाब म्हणजे यापैकी १०,१९६ तक्रारी फक्त आणि फक्त पूर्ण किंवा आंशिक क्लेम नाकारल्यासंबंधी होत्या.

दुसऱ्या क्रमांकावर केअर हेल्थ इन्शुरन्स असून त्यांच्याविरुद्ध ३,७१८ तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत. तिसऱ्या क्रमांकावर निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स असून या कंपनीविरुद्ध २,५११ तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत.

विमा लोकपाल अहवालात नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (२,१९६ तक्रारी) आणि द न्यू इंडिया अश्युरन्स कंपनी लिमिटेड (१,६०२ तक्रारी) या दोन सरकारी विमा कंपन्याही आहेत ह .

या यादीत स्पष्ट दिसणारी एक बाब म्हणजे स्टार हेल्थविरुद्ध तक्रारींची विशाल संख्या. जर आपण स्टार हेल्थ वगळून बाकी चार कंपन्यांच्या तक्रारी एकत्र केल्या, तरी त्या स्टार हेल्थच्या तक्रारींइतक्या नाहीत.




काहींच्या मते, ज्या कंपनीचे ग्राहक जास्त आहेत, त्यांच्याविरुद्ध तक्रारी देखील जास्त होतात. ही बाब काही प्रमाणात बरोबर आहे. पण या अहवालात प्रति एक लाख ग्राहकांवर किती तक्रारी नोंदवल्या गेल्या हे पाहिले असता कोणती कंपनी आपल्या ग्राहकांना कशी सेवा देते हे लक्षात येते. विशेष म्हणजे या निकषावरही स्टार हेल्थ अव्वल आहे.

- ■ **स्टार हेल्थ:** प्रति एक लाख ग्राहकांमागे ६३ तक्रारी
- ■ **निवा बुपा:** प्रति एक लाख ग्राहकांमागे १७ तक्रारी
- ■ **केअर हेल्थ:** प्रति एक लाख ग्राहकांमागे १६ तक्रारी

हा आकडा दाखवतो की ग्राहकसंख्येच्या आकाराच्या बाबतीतही, स्टार हेल्थचे ग्राहक त्यांच्या कंपनीबाबत सर्वाधिक नाराज आहेत आणि त्यांना लोकपालांकडे जावे लागते.

**क्लेम रिजेक्टच्या बाबतीत टॉप ५ कंपन्या**

- ■ **स्टार हेल्थ:** १०,१९६ तक्रारी
- ■ **केअर हेल्थ:** २,३९३ तक्रारी
- ■ **निवा बुपा:** १,७७० तक्रारी
- ■ नॅशनल इन्शुरन्स: १,४१९ तक्रारी
- ■ आदित्य बिड़ला हेल्थ इन्शुरन्स: १,००६ तक्रारी

**कोणत्या कंपन्यांना सर्वाधिक भरपाई द्यावी लागली?**

लोकपालकडे तक्रार केल्याचा फायदा म्हणजे तो विमा कंपनीला भरपाई देण्याचा आदेश देऊ शकतो. लोकपालाचा निर्णय कंपनीसाठी बंधनकारक असतो.

- ■ **स्टार हेल्थ:** ७,५०६ प्रकरणांमध्ये ₹६०.५४ कोटीचा भरपाई
- ■ **केअर हेल्थ:** १,६८७ प्रकरणांमध्ये ₹२०.१२ कोटी
- ■ **निवा बुपा:** १,२९७ प्रकरणांमध्ये ₹१६.५४ कोटी
- ■ **एचडीएफसी एर्गो:** ५६५ प्रकरणांमध्ये ₹६.४८ कोटी
- ■ **नॅशनल इन्शुरन्स:** १,०१५ प्रकरणांमध्ये ₹५.४० कोटी

**हेल्थ इन्शुरन्समधील तक्रारी वाढत आहेत का?**

होय, आणि हा चिंताजनक कल आहे. सीआयओच्या अहवालानुसार, जिथे जीवन विमा आणि सामान्य विमामध्ये तक्रारी कमी झाल्या आहेत, तिथे हेल्थ इन्शुरन्सच्या तक्रारींमध्ये २१.७ टक्क्यांची वाढ झाली आहे. त्यामुळे विमा पॉलिसी घेताना क्लेम सेटलमेंट रेशो पाहून खरेदी करणे हिताचे ठरेल.

# नगर शहरात ९ ते ११ ऑक्टोबर दरम्यान पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे आयोजन

**केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते उद्घाटन, प्रफुल्ल केतकर, विश्वास नांगरे पाटील, फैज खान हे प्रमुख वक्ते**



नगर – पंडित दीनदयाळ पतसंस्था आणि पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ९ ते ११ ऑक्टोबर दरम्यान व्याख्यानमालेचे सावेडी येथील माऊली सभागृहात दररोज सायंकाळी ६ वाजता आयोजन करण्यात आले आहे. देशाची सध्याची सामाजिक परिस्थिती, राजकीय जडणघडण, सांस्कृतिक परंपरा, हिंदू संस्कृती व औद्योगिक क्षेत्रात होणारे क्रांतिकारी बदल व देशाची बदलती परिस्थिती या सर्व विषयांवर प्रकाश टाकणारी व विचारवंतांच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन करणारी दिनदयाळ व्याख्यानमाला ही महाराष्ट्रातील नावलौकिक प्राप्त झालेली एकमेव व्याख्यानमाला आहे. पं.दीनदयाळ व्याख्यानमालेच्या माध्यमातून शहरात सांस्कृतिक चळवळीला बळ मिळत आहे, अशी माहिती पतसंस्थेचे संस्थापक, चेअरमन वसंत लोढा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

युवकांना प्रेरित करणारे वक्ते विश्वास नांगरे पाटील, अखिल भारतीय मुस्लिम मंचचे अध्यक्ष फैज खान, महाभारत या टीव्ही मालिकेला ज्यांनी 'मै समय हूं, असा आपला आवाज देऊन ती मालिका अजरामर बनवली. असे प्रख्यात आवाज तज्ञ हरीष भिमाणी, ऑब्झर्वर मासिकाचे नवी दिल्ली येथील मुख्य संपादक प्रफुल्ल केतकर हे या व्याख्यानमालेचे यंदाचे वैशिष्ट्य राहील. केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि रेणुका माता मल्टीस्टेटचे अध्यक्ष प्रशांत भालेराव, नेत्रतज्ज्ञ डॉ.सुधा कांकरिया, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिमांचल प्रमुख नानासाहेब जाधव आदी या व्याख्यानमालेसाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सामर्थ्य अनियंत्रित बेधुंद वर्तनात नाही, शुद्ध विचाराने नियंत्रित केलेल्या कृतीत असते, असे विचार मांडणाऱ्या पंडितजींच्या राष्ट्रनिर्मिती संकल्पनेवर आधारित व्याख्यानमालेचे हे ११ वे वर्ष आहे. ऑपरेशन सिंदूर प्रमाणे यंदा शब्द बाणांनी सुसज्ज अशा वक्त्यांना आणि त्यांच्या धगधगत्या विचारांना ऐकण्याची संधी या व्याख्यानमालेच्या निमित्ताने नगरकरांना उपलब्ध झाली असल्याचे लोढा यांनी सांगितले.

या व्याख्यानमालाच्या माध्यमातून अहिल्यानगर शहराला एक संस्कृतीक मेजवानीच मिळत आहे. मागील वर्षी या व्याख्यानमालेला नगरकरांनी प्रतिसाद मिळाला आहे. याही वर्षी मोठ्या प्रमाणात व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेला झालेली गर्दी पाहता यावेळी व्याख्यानमालेच्या नियोजनात मोठे बदल करण्यात आले. दोन ते अडीच हजार प्रेक्षकांना या व्याख्यानमालेचा लाभ घेता येईल. अशी बैठक व्यवस्था सावेडी येथील माऊली सभागृहात करण्यात आली आहे. तसेच या व्याख्यानमालेच्या प्रचारासाठी शहरातून एलईडी व्हॅन चौका चौकात जाऊन वक्त्यांचे, व प्रमुख पाहुण्यांचे मुलाखती दाखविण्यात येणार आहे. या व्याख्यानमालेसाठी अहिल्यानगरवासीयांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ट्रस्ट चे प्रवर्तक वसंत लोढा यांनी केले आहे.

९ ऑक्टोबर रोजी जगाचे बदलते रूप आणि भारताचा वाटा या विषयावर प्रफुल्ल केतकर यांचे व्याख्यान होईल. उद्घाटक केरळचे राज्यपाल महामहिम राजेंद्र आर्लेकर हे आहेत. तर प्रमुख पाहुणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव हे आहेत.

१० ऑक्टोबर रोजी राष्ट्रप्रेम ही युवकांच्या स्वप्नांची प्रेरणा या विषयावर प्रमुख वक्ते अतिरिक्त पोलीस महासंचालक (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई) चे विश्वास नांगरे पाटील हे आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून लेखक, चित्रपट निर्माते महाभारत मालिकेतील मै समय हूहा प्रसिद्ध आवाज ज्यांचा आहे ते हरीष भिमाणी हे आहेत. तर प्रमुख उपस्थितीत लेखिका व समाज सुधारक डॉ.सौ.सुधाताई कांकरिया हे आहेत.

११ ऑक्टोबर रोजी एकता, बंधुता, राष्ट्र प्रेम इस्लामी संस्कृतीचे खरे तत्व या विषयावर प्रमुख वक्ते राष्ट्रीय मुस्लिम मंच अध्यक्ष फैज खान हे आहेत तर प्रमुख पाहुणे खासदार सौ.नवनीत राणा हे आहेत. तर प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ अर्थतज्ञ व पतसंस्था चळवळीचे मार्गदर्शक डॉ.प्रशांत भालेराव हे आहेत.

या व्याख्यानमालेचे यशस्वीतेसाठी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन सुधीर पगारिया, मानद सचिव विकास पाथरकर, ज्येष्ठ संचालक मिलिंद गंधे, निलेश लोढा, बाबासाहेब साठे, श्रीमती शैला चंगेडे, व्यवस्थापक निलेश लाटे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, उपाध्यक्ष अशोक कानडे, अनुराग धूत, सहसचिव राहुल जामगावकर, कोषाध्यक्ष सुखदेव दरेकर, विश्वस्त उद्योजक संदेश लोढा, सोमानी मनीष, अनिरुद्ध देवचक्के, राजकुमार जोशी, अजित कृष्णन, कार्यकारणी सदस्य सुनील पंडित, अनिल जोशी, सीए ज्ञानेश्वर काळे, किशोर जोशी, रणजीत परदेशी, किशोर गांधी, महावीर कांकरिया, संग्राम म्हस्के, नरेंद्र श्रोत्री, अमोल भांबरकर, शामराव वागस्कर, निलेश चिपाडे कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहे.



अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेची अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी ॲड. युवराज पोटे यांच्या नावाची घोषणा करत संपूर्ण जिल्हा कार्यकारिणीची घोषणा केली. (छाया – लहू दळवी)

# अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेची अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**जिल्हाध्यक्षपदी ॲड. युवराज पोटे यांची निवड**

नगर – अखिल भारतीय अधिवक्ता परिषद देवगिरी प्रांत अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी निवडीची बैठक राष्ट्रीय सचिव ॲड. संजीव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी परिषदेच्या महामंत्री ॲड.संगीता बागुल यांनी जिल्हाध्यक्षपदी ॲड. युवराज पोटे यांच्या नावाची घोषणा करत संपूर्ण जिल्हा कार्यकारिणीची घोषणा केली.

बैठकीस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह हिराकांत रामदासी, संघटक उपाध्यक्ष ॲड. बाबुराव अनारसे, श्रीकांत अदवंत, अहिल्यानगरचे पालक ॲड. सुरेश मुंडे, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, राष्ट्रीय कार्यकारीणी सदस्य व केंद्र सरकारच्या स्थायी वकील अर्पिता झरकर, राष्ट्रीय कार्यकारीणी सदस्य व विभागप्रमुख ॲड. सुधीर भागवत, ॲड. सुधीर झरकर, ॲड. विनोद गायकवाड, ॲड. अमित झरकर, ॲड. सुनील सूर्यवंशी, ॲड. विकास सांगळे, ॲड. विनायक सांगळे, ॲड. कौस्तुभ कुलकर्णी, ॲड. किरण जाधव, ॲड. भाऊसाहेब पालवे, ॲड. सुनील आठरे यांच्यासह पदाधिकारी व अधिवक्त्यांची उपस्थित होती.

ॲड. संजीव देशपांडे म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विचार आपण सर्वजण समाजात रुजवत आहोत. आजच्या सार्वजनिक जीवनात न्यायालयीन व्यवस्थेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला न्याय मिळवून देण्याची जबाबदारी अखिल भारतीय अधिवक्ता परिषद पार पाडत आहे. पोलीस स्टेशनमध्ये आज गुन्हेगार घाबरत नाहीत. पण सर्वसामान्य माणूस घाबरतो, हा विषमतेचा प्रश्न आहे. त्याच्या हक्कांचे संरक्षण करण्याचे काम आपण अधिवक्त्यांनी करायला हवे. व्यावसायिक गुणवत्ता, नीतिमत्ता आणि प्रामाणिकपणा हे आपल्या व्यवसायाचे मर्म आहे. आपण स्वतःमध्ये परिवर्तन आणले नाही तर समाजाला उपदेश देण्याचा अधिकार आपल्याला नाही. अखिल भारतीय अधिवक्ता परिषद ही देशातील सर्वात मोठी अधिवक्त्यांची संघटना आहे. न्यायव्यवस्था शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे व समाजातील विषमता कमी करण्याचे काम परिषद करत आहे. समान नागरी संहिता मसुदा तयार करण्याचे कार्य देखील सुरु आहे. बाबाराव भिडे यांचा आदर्श आपण समोर ठेवून देशासाठी कार्य करणे गरजेचे आहे. समाजातील रस्त्यावरील खड्डे, स्वच्छता किंवा सर्वसामान्य माणसाचे प्रश्न हे सर्व न्यायालयीन मार्गाने जनहित याचिकेच्या माध्यमातून सोडविण्याची जबाबदारी अधिवक्त्यांनी स्वीकारली पाहिजे. सूत्रसंचालन ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी केले. जिल्हाध्यक्ष ॲड. युवराज पोटे यांनी आभार मानले.

# १०० मेळावे घेऊन अशोक कुटे व टीमने मोठे पुण्याचे काम केले : शशिकांत गाडे

## मराठा सोयरीकचा मोफत १०० वा मेळावा

नगर – अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्थेच्या माध्यमातून अशोक कुटे व त्यांच्या टीमने १०० वधु वर मेळावे घेऊन मोठे पुण्याचे काम केले आहे, असे उद्गार अहिल्यानगर शिवसेना जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे यांनी मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी काढले.



मराठा सोयरीक संस्थेच्या मोफत वधू वर मेळावा पार पडला.

अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १०० वा मोफत मराठा वधु वर परिचय मेळावा नगर शहरात हॉटेल यश ग्रॅण्ड येथे उत्साह मध्ये पार पडला. या मेळाव्यामध्ये संस्थेने तयार केलेल्या अत्याधुनिक अशा वेबसाईट व मोबाईल ॲपचे उद्घाटन रीलस्टार सनी सकट व जान्हवी लटके यांच्या हस्ते करण्यात आले.

मेळाव्यासाठी रमाकांत गाडे, महेश गाडे, सिन्नरमधील प्राध्यापक राजाराम मुंगसे, संचालिका जयश्री कुटे, पारुनाथ ढोकळे, उद्योजक शरद ठाणगे, मधुकर निकम, हरिश्चंद्र दळवी, सयाजी निमसे, गोरक्षनाथ पटारे, मनोज सोनवणे, शशिकांत भांबरे, शांतीलाल कोहक, अनिल अकोलकर, प्रमोद झावरे, प्रा. योगेश कोतकर, संगीता ठुबे, मंदा कोतकर इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.

आज काल एक लग्न जमवणे म्हणजे खूप अवघड असते, अशावेळी अशोक कुटे व त्यांच्या टीमने ५००० पेक्षा जास्त लग्न जमवले व त्यामध्ये ५००० पैकी ५६७ लग्न हे विधवा, विदूर, घटस्फोटीत यांचे जमवले ही विशेष गोष्ट आहे असे उद्गार सिन्नरचे मराठा सेवा संघ तालुका अध्यक्ष प्रा. राजाराम मुंगसे सर यांनी काढले.

मेळाव्यास विविध जिल्ह्यातून वधू वर पालक उपस्थित होते. सर्वांचे बायोडाटा वाचन जयश्री कुटे यांनी केले. विविध स्थळांची माहिती फोन नंबरसह सर्वांना देण्यात आली.

सूत्रसंचालन हरिश्चंद्र दळवी यांनी केले. पारुनाथ ढोकळे यांनी आभार मानले. जे मेळाव्यासाठी येऊ शकले नाहीत त्यांनी ८८४७७२४६८० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सिद्धीतप पूर्णाहुती सोहळ्यात तपस्वीच्या जयजयकाराने आगरकर मळा दुमदुमला

**तप आराधना मनुष्याला आत्मिक आनंद आणि समाधान देते : अनुप्रेक्षाजी म.सा.**



आगरकर मळा स्थानकात चातुर्मासानिमित्त विराजमान अनुप्रेक्षाजी म.सा. आदी ठाणा यांच्या प्रेरणेने ४५ दिवसांचे सिद्धीतप करण्यात आले.

नगर – आगरकर मळा स्थानकात चातुर्मासानिमित्त विराजमान अनुप्रेक्षाजी म.सा. आदी ठाणा यांच्या प्रेरणेने अनेक भाविकांनी ४५ दिवसांचे सिद्धीतप केले. या सिद्धीतपाची पूर्णाहुती अतिशय उत्साहात करण्यात आली. सजवलेल्या रथातून तपस्वींची वरघोडा मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिला, पुरूष भाविकांनी पारंपरिक पेहराव केला होता. पुरुषांनी डोक्यावर फेटे बांधले होते. विविध धार्मिक गीतांच्या चालीवर उत्साहात पारंपरिक नृत्य करण्यात भाविक दंग झाले होते. तपस्वींचे गुणगान, सन्मान करण्यात आला. यावेळी जालना येथील गायिक दर्शित गादिया यांनी सुमधुर भक्तीगीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

मार्गदर्शन करताना अनुप्रेक्षाजी म.सा. यांनी सिद्धीतपाचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व विशद केले. तप आराधना मनुष्याला आत्मिक आनंद आणि समाधान देते. जीवन जगताना सकारात्मक ऊर्जा मिळते. मोठ्यांपासून प्रेरणा घेऊन नवीन पिढीही धर्माचरणाकडे वळून सुसंस्कृत, सुसंस्कारित होण्यास मदत होते. आगरकर मळा येथे चातुर्मासात भाविकांचा प्रचंड उत्साह पहायला मिळाल्याचे त्यांनी म्हटले.

आगरकर मळा श्रावक संघाचे अध्यक्ष अभय कोठारी यांनी सांगितले की, या सोहळ्यात पैंसठिया यन्त्र जाप च्या चांदीच्या कलशाचा लिलाव श्रीमती शोभाताई शरद मेहेर तथा शिल्पा शैलेश मेहेर यांनी घेतला. आमदार संग्राम जगताप यांनी शिर्डी येथून फ़ोन करून तपस्वींचे कौतुक केले. यावेळी

प्रदीप गांधी यांच्या २१ उपवासाची पचकावनी झाली. सविता कोठारी यांचे ३१ उपवास, पूनम गांधी यांचे १७ उपवास, लतिका भळगट यांचे १५ उपवास, कु. श्रेया पितळे यांचे ९ उपवास, अभिषेक भंडारी यांचे ९ उपवास, प्रिया फिरोदिया यांचे ९ उपवास, मनाली चोपड़ा यांचे ९ उपवास, ताराचंद डूंगरवाल यांचे ८ उपवास तसेच गणधर तप, सिद्धी तप, पद्मावती एकासना असे अनेक तपस्या झाल्या.

याप्रसंगी जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, रतिलाल कटारिया (कडा), दिलीप लूणिया, संदीप ग़ांधी, विपुल शेटिया. विजय गुगळे, संतोष मेहेर, विजय मेहेर (आष्टी), अतुल शिंगवी, गितांजली काळे, सुवर्णा जाधव, अनिल शिंदे, दिपक खैरे, दत्ता जाधव, दत्ता गाडळकर, प्रशांत गायकवाड, किशोर फिरोदिया, गोकुळ गांधी, अमृत मुथियान आदींसह भाविक उपस्थित होते.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले, चातुर्मासात आगरकर मळा येथे भाविकांना मोठी धार्मिक पर्वणी प्राप्त झाली. साध्वीजींच्या प्रवचनातून प्रत्येकाला आनंदी जीवनाचा मार्ग गवसला. तपस्वींनी श्रद्धापूर्वक उपवास करून धर्माचरण केले. अशा धार्मिकतेमुळे समाजात आनंदी वातावरण तयार होण्यास मदत होते.

या सोहळ्यासाठी आगरकर मळा श्रावक संघाचे अध्यक्ष अभय कोठारी, उपाध्यक्ष सुरेश पगारिया, सेक्रेटरी प्रमोद गादिया, सहसेक्रेटरी वृषभ गांधी, खजिनदार अनिल मुथा व शैलेश मेहेर, योगेश मांडोत, महेश मुनोत, जगदिश मुथा, प्रविण कटारिया, परितोष मुथ्या, प्रविण कोठारी आदींसह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सर्व भाविकांसाठी गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली होती.

# सीए विद्यार्थ्यांसाठी नगरमध्ये १० व ११ ऑक्टोबरला दोन दिवसीय राज्यस्तरीय विद्यार्थी परिषदेचे आयोजन



सीए अभयकुमार कटारिया

नगर – दि इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकौटंटस् ऑफ इंडिया अ.नगर सीए विद्यार्थी शाखेच्या वतीने नगर येथे १० व ११ ऑक्टोबर रोजी सीए भवन येथे विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय राज्यस्तरीय विद्यार्थी परिषदेचे आयोजन करण्यात आले असुन ही विद्यार्थी परिषद दि इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकौटंटस् ऑफ इंडियाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या बोर्ड ऑफ स्टडीज नवी दिल्ली अंतर्गत घेण्यात येते.

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, लघु सूक्ष्म उद्योग (MSME) या संदर्भातील येणाऱ्या काळातील आव्हाने व संधी, शेअर्स म्युच्युअल फंड गुंतवणूक संदर्भातील सावधानता, नवीन आयकर कायदा, आर्थिक धोक्यापासून बचाव, मानसिक ताणतणाव नियोजन, सीए विद्यार्थी परीक्षेची तयारी, सामाजिक बांधिलकी व इतर अनेक विषयावर व्याख्यान देण्याकरिता विविध मान्यवरांना भारतभरातून आमंत्रित केले गेले असुन ह्या संधीचा प्रत्येक विद्यार्थ्याने परिषदेस उपस्थित राहून लाभ उठवावा असे आवाहन अहमदनगर सीए शाखेचे विकासा अध्यक्ष अभयकुमार कटारिया यांनी केले आहे.

या परिषदेमध्ये सीए दुर्गेश काबरा, सीए गिरीश अहुजा, सीए वीजेन्द्र जैन, सीए जितेंद्र सगलानी, सीए पीयूष चांडक, संजय मालपाणी, सीए रिषभ जैन, सीए पीयूष छाजेड, सीए हृदयेश पंखानिया, सीए कार्तिक जिंदाल, भूषण मालू तसेच सीए आकाश कंदोई या सारखे वक्ते हजेरी लावणार आहेत तर बोर्ड ऑफ स्टडीज नवी दिल्ली येथून सीए संजीब संघी हे सुद्धा उपस्थित राहणार आहेत.

या वेळेस बोलताना सीए विद्यार्थी शाखा उपाध्यक्ष ब्राम्ही शिंगवी यांनी सागींतले कि, या परिषदेत महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकाणाहून बारा विद्यार्थी कॅपिटल मार्केट, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स AI, लघु व सूक्ष्म उद्योग, आर्थिक साक्षरता, इन्कमटॅक्स, जीएसटी, ऑडिट आणि भारताचे अर्थशास्त्र ईत्यादी विषयांवर आपले मत मांडतील.

सदर परिषद यशस्वी करण्यासाठी अहमदनगर शाखेचे अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक, अहमदनगर सीए विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष अभयकुमार कटारिया, सचिव सीए महेश तिवारी, खजिनदार सीए महेश भळगट, समिति सदस्य सीए सुनंदा रच्चा, सीए विद्यार्थी शाखा उपाध्यक्ष ब्राम्ही शिंगवी, आबुजर शेख, तेजस कासवा, वेद सुवर्णपाठकी, राशि कर्नावट, अक्षय कटारिया, ऋषिकेष डफळ हे परिश्रम घेत आहेत.

# दिव्यांगांचा उदरनिर्वाह भत्ता दिवाळीपूर्वी द्यावा

**जिल्हाधिकारी यांना निवेदन, महानगरपालिका हद्दीतील सर्व दिव्यांगांना नोंदणी करा**

नगर – अहिल्यानगर महापालिका हद्दीतील दिव्यांगांचा उदरनिर्वाह भत्ता दिवाळीपूर्वी देण्याची मागणी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तर महानगरपालिका हद्दीतील सर्व दिव्यांग बंधू-भगिनींना महापालिकेच्या माळीवाडा येथील आनंदऋषी व्यापारी संकुलातील दिव्यांग कक्षात नोंदणी करण्याचे आवाहन प्रहारचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे, महिला शहराध्यक्षा मनीषा जगताप, पोपटराव शेळके, जिल्हा सचिव हमिद शेख यांनी केले आहे.

केंद्र सरकारचा दिव्यांग हक्क अधिनियम कायदा १९९५, २००५ आणि नव्याने झालेल्या कायद्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाकडे प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेने अनेक आंदोलने उपोषणे केले. आतापर्यंत जवळजवळ ४८ पेक्षा जास्त शासन निर्णय मंजूर झाले आहेत. राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थेने एकूण उत्पन्नाच्या नव्याने काढलेल्या शासन नियम निर्णयाप्रमाणे ५ टक्के निधी दिव्यांगांच्या स्वयंरोजगार, पुनर्वसन किंवा दिव्यांग यांची आर्थिक दृष्ट्या सक्षमीकरण किंवा दिव्यांगांना पेन्शन, आरोग्य सुविधा, शैक्षणिक सुविधा, शैक्षणिक शिष्यवृत्ती आदी कारणांसाठी या निधीचा वापर केला जावा, असे निर्देश दिलेले आहेत.

दिव्यांग व्यक्तीला समाजाच्या मुळ प्रवाहात आणण्यासाठी जन्ममृत्यूच्या धर्तीवर स्वतंत्र अभिलेख बनवून नोंद करणे अनिवार्य असताना सुद्धा बऱ्याच स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या अधिकार क्षेत्रातील दिव्यांगांचे स्वतंत्र अभिलेख बनवून परिपूर्ण माहितीसह नोंदणी केलेली नाही. त्यांच्यापर्यंत शासनाच्या दिलेल्या योजना व सवलती दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली माहिती उपलब्ध जर करून दिली नाही तर कर्तव्यात कसूर केला व गरजू दिव्यांग व्यक्तीला त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवून त्यांची फसवणूक केली म्हणून कलम ९३ अन्वये ५ ते ५० हजार रुपये व दोन वर्षे शिक्षा या दोन्हीपैकी एक किंवा दोन्हीही शिक्षाची स्पष्ट तरतूद संविधानात करण्यात आलेली असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

यासाठी महानगरपालिका हद्दीतील सर्व दिव्यांग बंधू-भगिनींना दिव्यांग कक्षात नोंदणी करावी. नोंदणीसाठी दिव्यांग प्रमाणपत्र, आधार कार्ड, रेशन कार्ड, नॅशनल बँकेचे बँक पासबुक अनिवार्य असल्याचे म्हटले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# श्रीगोंदा येथील श्री आदेश्वर भगवान जैन मंदिर जिर्णोद्धारासाठी कापड बाजार जैन मंदिर ट्रस्टच्यावतीने ९ लाख रुपयांची देणगी

**तरूण पिढी मोठ्या प्रमाणात जैन मंदिर, जैन तीर्थस्थळी आल्यास त्यांच्यात चांगले संस्कार रूजण्यास मदत : सुभाष मुथा**



श्रीगोंदा येथील श्री आदेश्वर भगवान जैन मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी कापड बाजार जैन मंदिर ट्रस्टच्यावतीने ९ लाख रुपयांची देणगी देण्यात आली.

नगर – समाजातील तरूण पिढी मोठ्या प्रमाणात जैन मंदिर, जैन तीर्थस्थळी आल्यास त्यांच्यात चांगले संस्कार रूजण्यास मदत होईल. समाजात धार्मिकता वाढली, साधू संतांचे विचार अंगिकारले तर खऱ्या अर्थाने प्रत्येकाला वैयक्तिक तसेच सामाजिक जीवनातही आनंदाने राहता येईल. यासाठी उपासना महत्त्वाची आहे. यासाठी मंदिरांची निर्मिती झाली, जिर्णोद्धार होत असेल तर त्याला समाजातील दानशूरांनी सढळ हाताने देणगी दैऊन पुण्याचे काम करावे. त्यामुळे येणाऱ्या नवीन पिढीसाठी एक आदर्श निर्माण होईल, असे प्रतिपादन कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी केले.

आचार्य भगवंत श्री विश्वकल्याण सुरीश्वरजी महाराजा साहेब आदि ठाणा यांच्या निश्रामध्ये श्रीगोंदा जैन मंदिर जिर्णोद्धाराचे काम सुरू आहे. या कामासाठी सुभाष मुथा यांच्या हस्ते ९ लाखांचा धनादेश प्रथम तीर्थंकर श्री आदेश्वर भगवान जैन मंदिर, श्रीगोंदाचे अध्यक्ष दिलीपभाई मेहता यांना देण्यात आला. यावेळी ट्रस्टी मणिकांतभाई भाटे, जयकुमार पुंगलिया, डॉ. सागर पटवा, महेंद्रभाई मेहेर, संजय बेदमुथा, जितेंद्र पोरवाल इत्यादी ट्रस्टी उपस्थित होते. मंदिराचे दुरुस्ती काम आणि जिर्णोद्धारासाठी जैन मंदिर कापड बाजार ट्रस्ट तर्फे ९ लाख रुपयांचा धनादेश देणगी म्हणून देण्यात आला. राजस्थान मकराना येथील कुशल कारागीर सुंदर नक्षीकाम करून मंदिराचे काम करत आहेत.

सुभाष मुथा पुढे म्हणाले की, नगर – पुणे रस्त्यावरील सुपा (ता. पारनेर) येथील श्री चंद्रप्रभू स्वामी जैन मंदिराचे नूतनीकरण, कोल्हार येथील कैवल्यधाम जैन तीर्थस्थळ, जामखेड येथील नूतन मंदिर, माणिकनगर जैन मंदिर, सोनई, नेवासा, वांबोरी, मिरजगाव इत्यादीसह विविध जैन मंदिराच्या कामांसाठी तसेच गोसेवा म्हणून विविध गोशाळांना कायम देणगी देण्यात येते. भविष्यात जैन मंदिरासाठी जी मदत लागेल ती देण्याचा प्रयत्न राहील. कारण नगरमधील कापडबाजार जैन मंदिर हे शहरातील व जिल्ह्यातील सर्व जैन मंदिरांसाठी थोरल्या भावासारखे असून याच कर्तव्य भावनेतून वेळोवेळी इतर जैन मंदिरांना देणगी देण्यात येते. समाजातील इतर ट्रस्ट व खाजगी व्यक्तींनी पूढे येत या धर्म कार्यास हातभार लावावा असे आवाहन सुभाष मुथा यांनी केले आहे.

